
# चैतन्य लहरी

अंक क्र. १, २

जानेवारी-फेब्रुवारी'९९



गणपतीपुळे सेमिनार विशेषांक







# अनुक्रमणिका


| तपशिल | पान क्र. |
|---|---|
| १) गणपतीपुळे सेमिनार १९९८-सविस्तर कार्यक्रम | ३ |
| २) ख्रिसमस पुजा (गणपतीपुळे २५ डिसें. १९९८) | ७ |
| ३) पाश्चात्त्य सहजयोगी व सहजसंगीत | १४ |
| ४) संगीत कार्यक्रमानंतर प. पू. श्री माताजींनी केलेला उपदेश | १५ |
| ५) प्रोटोकॉल्स— श्री अरूण गोएल यांनी गणपतीपुळे शिबीरात सहजयोग्यांना केलेल्या सुचना | १८ |
| ६) पाश्चात्त्य सहजयोगी व सहजसंगीत | २० |
| ७) प. पु. श्री माताजींचे पुजा प्रसंगी प्रवचन (कळवा : ३१ डिसें. ९८) | २१ |

# फोटोंचा तपशिल

**कव्हर पान १**

- गणपतीपुळे सेमिनार मधिल सुरुवातीची कलकीचा पांढऱ्या शुभ्र घोड्यांचा रथ असलेली भव्य ८०-१०० फुट उंचीची कमान.
- डाव्या बाजूला असंख्य दिपमाळांपैकी एक दिपमाळ.
- उजव्या बाजूला अत्यंत आकर्षक स्टेजवरील विविध डेकोरेशन पैकी काही अंश.
- खाली सेमिनार समोरील प्रसन्न समुद्र किनाऱ्यावरील असंख्य सहजयोगी.

**कव्हर पान २**

- प. पु. श्री माताजींच्या २५ डिसेंबर १९९८ रोजी पुजेनंतरचा फोटो.
- खाली डाव्या बाजूला वेस्टर्न सहजयोगी संगीत सादर करताना.
- उजव्या बाजूला चेन्नईचे सहजयोगी श्री. माताजींच्या समोर केरळचे प्रसिद्ध कोळी गीत सादर करताना.

**कव्हर पान ३**

- मागील बाजूस असंख्य डेकोरेशनच्या झोपड्यांपैकी एक.
- उजव्या बाजूस वरील बाजूस औरंगाबादच्या 'नृत्य झंकार' ग्रुपच्या श्रीमती मीरा पावसकर आणि ग्रुपने भरतनाट्य, कुचीपुडी सादर करताना.
- डाव्या बाजूस २७ डिसेंबर रोजी पहाटे अरुण आपटे तल्लीन होऊन श्री माताजींच्या समोर गाताना.
- खाली, धर्मशाळेच्या मुलींनी श्री माताजींच्या समोर भरतनाट्य, कुचीपुडी सादर करताना.

**कव्हर पान ४**

- वरील बाजूवरील फोटो मुख्य कार्यक्रमाच्या पेंडॉलच्या बाहेरील १५ फुटी कमान
- डाव्या बाजूस पुण्याच्या महिलांनी सामूहीक तयार केलेल्या मेणबत्त्या विक्री स्टॉल.
- उजव्या बाजूला सहजयोग्यांच्या भोजनाच्या अतिभव्य हॉलची दर्शनी बाजू.
- खालील बाजूस मुख्य पेंडॉलमधील असंख्य सहजयोगी श्री. माताजींसमोर कार्यक्रम पाहताना.

# गणपती पुळे सेमिनार डिसेंबर १९९८

## सविस्तर कार्यक्रम

गणपतीपुळे सेमिनारच्या निमित्ताने ह्या सेमिनार बद्दलची पार्श्वभूमि सांगाविशी वाटते ती अशी.

गणपती पुळे येथे स्वयंभू महागणपती असून त्यांच्या चरणाशी सुंदर समुद्र किनारा आहे. समुद्र हे जल तत्व- म्हणजेच गुरुतत्व आहे व ते महागणेशाच्या चरणाशी आले आहे. त्यामुळे गणपती पुळे हे स्थान "सहज योग" सेमिनारसाठी योग्य असेच मानले गेले. प्रथम १९८५ साली गणपती-पुळ्या जवळील सुप्रसिद्ध कवी केशवसुत यांच्या जन्मगावी म्हणजेच "मालगुंड" येथे महिला सेमिनार आयोजित करण्यात आला. त्यानंतर जवळ जवळ २/३ वर्षे सेमिनार मालगुंड येथेच झाले. त्यानंतर ते आता होतात त्याठिकाणी आयोजित करण्यात येत आहेत.

यंदा गणपती पुळे सेमिनार २२ डिसेंबर १९९८ ते २९ डिसें ९८ असे आठ दिवस आयोजित केला होता. यंदा संपूर्ण भारतातून सात हजार सहजयोगी व परदेशातून साडे पांचशे सहज योगी सेमिनारला आले होते. या सर्वांची राहण्याची व्यवस्था मोठ-मोठ्या लांब रुंद मंडपात केली होती. महिला व पुरुष सहजयोग्यांची राहण्याची व्यवस्था वेगवेगळ्या मंडपात केली होती. सुरक्षा स्वयंसेवक म्हणून महिला व पुरुष सहजयोगीच चोख कामगिरी बजावत होते. सर्व सहजयोग सेमिनार प्रतिनीधींना त्यांचे ओळखपत्र देण्यांत आले होते. हे ओळखपत्र प्रत्येक जण आपल्या पोशाखाला सहज दिसेल असे लावूनच सेमिनारला येत होता. सेमिनार व्यवस्थित व शिस्तीने आयोजित करण्याचे काम मुख्यत्वे करुन मुंबई केंद्र व महाराष्ट्रातील युवा शक्तींच्या पुढाकाराने झाले. प. पू. माताजींचे मार्गदर्शन व आशिर्वाद होतेच.

दिनांक २२ डिसेंबर रोजी सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत भारत भरातील सहज योगी सेमिनारसाठी येत होते. तेथील व्यवस्था पाहून थक्क होते. सेमिनारच्या प्रवेशद्वारा समोरच भव्य मंडपात सर्वांची राहण्याची व्यवस्था होती. प्रवेश द्वारावर एक भव्य कमान उभारण्यांत आली होती, त्यावर ढगांचे डेकोरेशन केलेले होते व त्या कमानीचे वर मध्य भागी सहा फुटी पांढऱ्या शुभ्र घोड्यांचा सूर्याचा रथ होता. सजावट अत्यंत आकर्षक व नजरेत भरणारी होती.

सर्व सहजयोगी समुद्रावर जाऊन ट्रिटमेंट वगैरे करुन मुख्य सेमिनारच्या भव्य मंडपाकडे जात होते. सेमिनारचा मंडप हंड्या, झुंबरे, विद्युत रोषणाई करुन सुशोभित केला होता. सेमिनारसाठी केलेले व्यासपीठही अत्यंत कौशल्याने सुशोभित केले होते. व्यास-पीठावर कमानी-कमानींचे तीन भाग केले होते; डावीकडील, मधील व उजवीकडील. त्यात दररोज देखावा व दिवसाच्या वैशिष्ट्यास योग्य असे चित्रण करत होते. व्यासपीठावर प. पू. श्री माताजींचा फोटो व त्यांचे आसन सुशोभित करुन ठेवले होते. सर्व सहजयोगी मंडपात येऊन प. पू. श्री. माताजींच्या फोटोस नमस्कार करुन ध्यानास बसत होते. सर्व तयारी प्रसन्न वातावरण निर्मितीस पोषक होती.

दररोज सकाळी ६ वाजता मुख्य मंडपात सामुहिक ध्यान होत असे. त्यानंतर सर्व सहजयोगी समुद्रावर जाऊन ट्रिटमेंट वगैरे करुन मुख्य मंडपांत येत. काही सहजयोगी-पुस्तके, गाण्याच्या कॅसेट, फोटो वगैरे खरेदीसाठी जात. मुख्य मंडपात सहजयोगी जमल्या नंतर भारतातील विविध राज्यातून आलेल्या सहजयोगी बंधू-भगिनींशी सहजयोग-ट्रिटमेंट, सहजयोग प्रचार व प्रसार, सहज संगीत यावर विचारांची देवाण घेवाण करीत तसेच काही गोष्टींवर चर्चा करीत, व त्यांच्याकडील भागात झालेली प्रगती कशी झाली हे समजाऊन घेत. ह्यातून सर्वांना नवनवीन गोष्टी समजत होत्या आणि त्यामुळे सर्व आपआपल्या भागात सहजयोग प्रचार करण्यास त्या नवीन बाबींचा उपयोग करण्याचे मनाशी ठरवीत होता.

**२२ डिसेंबर**

पहिल्या दिवशी फारसे कार्यक्रम नव्हते कारण परगांवचे सहज योगी नुकतेच येऊन स्थिरावत होते. रात्री ८ च्या सुमारास बाबामामा स्टेजवर आले व सर्वांची मने जिंकून टाकणाऱ्या शैलीत त्यांनी सलामी दिली व संगीत सरिताच्या संगीताचा रसिला कार्यक्रम सुरु झाला.

श्रीमति छायाने "अल्ला तेरो नाम ईश्वर तेरो नाम" हे भजन म्हटले. नंतर श्री अनिल याने "निर्मला किती वर्णावी [illegible] स्तुति" हे भजन म्हटले. त्यानंतर डॉ. सिंघल, श्री. [illegible] शर्मा, कुमारी आकांक्षा, नॉयडा ग्रुप यांची गाणी झाली.

रात्री १० च्या सुमारास श्री अरुण आपटे गायला बसले. त्यांनी "सख्या निकस गई मै ना पडी थी रामा" हे भजन साधारण तासभर गायले. सर्व सहजयोगी आनंदाने बेहोष झाले होते. त्यानंतर डॉ. सिम्पल, नॉयडा ग्रुप नी ठेक्याची भजने गायली. शेवटी अॅकॅडेमीमधील पाश्चात्य कलाकारांनी श्री बाबा मामा यांनी लिहिलेले कव्वाली "या अली" ने रात्री १२.३० वा. सादर केली

व कार्यक्रमाची सांगता झाली.

**२३ डिसेंबर**

संध्याकाळी श्री माताजी येण्याची शक्यता असल्याने सर्वजण पेंडॉलमध्ये लवकरच आले होते. रात्री ९.०० च्या सुमारास श्री बाबा- मामा, श्री अरूण आपटे व संगीत सरीताग्रुपचे स्टेजवर आगमन झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला रशियन सहजयोग्यांनी राग दुर्गा सादर केला. श्रीमती छायाने "जरी असणे अंतरी मनाचा" हे मराठी गीत म्हटले. त्यानंतर कुमारी आकांक्षाने 'माँ तेरे निर्मल प्रेम को मेरा शत शत प्रणाम" गायले. त्यानंतर वेस्टर्न सहजयोग्यांनी "तराणा" हा अवघड प्रकार सादर केला. त्यानंतर अरुण आपटेंच्या मार्गदर्शनाखाली वेस्टर्न सहजयोग्यांनी "माताजी तुही भवानी" हे भजन सादर केले. डॉ सिपल यांनी भजन व श्री अनिल यांनी " आया हू दरबार मे " म्हटले.

त्यानंतर श्री अरुण आपटे गायला बसले; त्यांनी तासभर " अबिर गुलाल" हे भजन गायले. सर्व सहजयोगी व्हायब्रेशन्समध्ये न्हाऊन निघाले. त्यानंतर श्री दिपक वर्मा यांनी 'शंकर भोले भाले' हे भजन गायले.

मध्यरात्रीच्या सुमारास प्रशांत भोपटकर यांनी गिटारवर दरबारी राग वाजवला.

**२४ डिसेंबर**

गणपती पुळे येथे प. पू. श्री. माताजींचे आगमन झाल्याचे सर्व सहज योग्यांना समजले व सर्वांना अत्यानंद झाल्याचे त्यांच्या चेहऱ्यावरुन व हालचालींवरुन दिसत होते. त्या दिवशी सकाळचे सामुहिक ध्यान फारच उत्तम झाले. सर्व सहजयोगी उत्साहित झाले होते. सगळेजण आपले कार्यक्रम उरकून लौकरात लौकर मुख्य पेंडॉल मधे जमत होते. आज मुख्य मंडपात स्टेजवर विणा सरस्वतीचे प्रतिक व मोर असे सुरेख डेकोरेशन केले होते. सरस्वतीचे प्रतिक बरोबर श्री माताजींच्या आसनामागे आले होते व उजव्या बाजूस विणा व डाव्या बाजूस मोर असे सुंदर सरस्वतीचे स्वरुप प. पू. माताजींचेच वाटत होते. प. पू. श्री. माताजी आकाशी रंगाचा बुट्ट्याचा शालू नेसुन आल्या होत्या. श्री माताजींचे सर्व सहज योग्यांनी भव्य स्वागत केले. आसमंत प. पू. माताजी की जय... या जयघोषाने दुमदुमुन गेला. अगदी खरोखरीचे श्री आदिशक्तिचे आगमन झाले होते, सर्व जण चैतन्यात न्हाऊन निघत होते. श्री माताजी आसनस्थ झाल्यावर हातात वीणा घेऊन मोरावर स्वार झाल्या सारखे दिसत होते. त्यांच्या उपस्थितीत संगीताची मैफिल छान रंगली. विशेष करून ॲकॅडेमीतील पाश्चात्य कलाकारांनी सादर केलेली कव्वाली उत्कृष्ट होती.

आज सहजयोगातील नवीन कलाकारांनी कार्यक्रम सादर केला. कानपूरची कुमारी पाटकचे "वृक्ष शोधिले ब्रह्मांड मिळाले" हे गीत, कुमारी सोनम भरतनाट्यम, कु. सोनल गिंडे (डोंबिवली) मुरळी नाच, दक्षिण आफ्रिकेतील सहजयोग्यांनी श्री माताजी दक्षिण आफ्रिकेत येण्याचे आवाहन असणारे गीत असे कार्यक्रम झाले.

त्यानंतर मुंबईचे श्री सुनिल कसबेकर यांनी सुधीर फडके यांचे गीत 'देव नाही देव्हाऱ्यात' फारच सुंदर गायले. त्यांचे श्री माताजींनी कौतुक केले. श्री संजय तलवार यांनी "हमे माँ से प्यार इतना" हे गीत सादर केले.

दोन वेस्टर्न सहजयोग्यांनी ३ महिन्यात शिकुन तबला जुगलबंदी सादर केली. कार्यक्रम चांगला झाला. त्यानंतर डॉ. सिपम गायला बसले त्यांनी माँ सर्वेश्वरी जगदिश्वरी" हे भावगीत सादर केले. त्यानंतर धरमशाळेच्या मुलींनी भरतनाट्यम सादर केले.

त्यानंतर अमेरिकन सहजयोग्यांनी गिटारावर राग 'यमन' सादर केला. श्री अनिल व श्री छाया यांनी गझल "वो जो सामने सहेरे की बैठी हो दोनो यहां से " सादर केले.

मध्यरात्री १२ वाजता श्री येशूचा वाढदिवस साजरा झाला. त्यावेळी २,३ कॅरल गीते वेस्टर्न सहज योग्यांनी गायली त्यात श्री माताजी सहभागी झाल्या, त्यानंतर बाहेरील बाजूस शोभेचे दारूकाम झाले व त्या दिवसाच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

**२५ डिसेंबर**

दि. २५ डिसेंबर हा ख्रिसमसचा दिवस. त्यादिवशी सकाळी पूजेचा कार्यक्रम होता. तेव्हा स्टेजवर मागील बाजूस- डाव्या बाजूला देवदूत, उजव्या बाजूला देवदूत व मधोमध छोट्या जीझसला कडेवर घेतलेली मेरी माता अशी यथार्थ सजावट केली होती.

सकाळचे सामुहिक ध्यान करुन सर्व सहजयोगी ट्रिटमेंट, स्नान वगैरे करुन पेंडॉलवर जमत होते. थोड्याच वेळात पेंडॉल भरून गेला. त्यानंतर ११ च्या सुमारास प. पू. श्री माताजींचे आगमन झाले. त्यांनी बदामी रंगाचा शालू परिधान केला होता.

भजनांची सुरुवात " जोगव्याने" केली. त्यानंतर नमो नमो मारीया, श्री जगदंबा आई रे, ये आज तेरी सुजेपाल, सातों जनम जो पुण्य किया,' हार्ट ऑफ दि युनिव्हर्स, ही भजने झाली.

श्री माताजींनी प्रथम इंग्रजीतून व नंतर हिंदीतून मार्गदर्शन केले. ख्रिस्ताबद्दल सांगताना श्री मातजींनी निर्विचारतेचे महत्व सांगून तन्मात्रांबद्दलची माहिती विशद केली.

हिंदीमधे बोलताना उत्तरेतील लोकांनी गणपती पुण्याल दरवर्षी सेमिनारला येण्याची आवश्यकता श्री माताजींनी विशद केली. कारण इतकी वर्षे महाराष्ट्रात मेहनत घेऊनही अगुरुंच्या प्रभावामुळे सहज योग प्रसार येथे पाहिजे एवढा झाला नाही.

उत्तरेत अपेक्षेपेक्षा जास्त सहजयोगाचा प्रसार झाला, म्हणून उत्तरेतील सहज योग्यांनी दरवर्षी गणपती पुळे सेमिनारला (महाराष्ट्रात) येऊन ह्या अगुरुंना हटवले पाहिजे म्हणजे महाराष्ट्रात सहज योगाची प्रगती होईल, असा उपदेश केला व अनंत आशिर्वाद दिले. ह्या वर्षीच्या पुजेचे वैशिष्ट असे की, श्री माताजींनी प्रस होऊन लहान मुलांना चरणाभिषेकासाठी बोलावले. आणि थोड्याच वेळात मंडपातील जवळ जवळ सर्वच लहान मुले (अंदाजे २५० मुले) स्टेजवर आली, हा चरणाभिषेक श्री माताजींनी साधारण १-१/२ तास करुन घेतला.

**२६ डिसेंबर**

दि. २६ ला स्टेजच्या मागे एका बाजूस त्रिशुल दुसऱ्या बाजूस डमरु व मधोमध नटराज असे डेकोरेशन केले होते. त्या दिवशी भारतीय व परदेशी सहज योग्यांनी एकमेकांना भेट वस्तू देण्याचा कार्यक्रम झाला. याशिवाय सायंकाळी सहज संगीताचे कार्यक्रम वेगवेगळ्या केंद्रातर्फे सादर झाले.

मुंबई युवा शक्ती, पुणे युवा शक्ती, डेहराडून युवा शक्ती अमरावती ग्रुप यांनी गाणी सादर केली. अमरावती ग्रुपने धन्य हुई भारत माता, सब तेरी जय जय हो.

चलो रे सहजी गणपती पुळे, श्री माताजी आ रही है, ही नवीन भजने सादर केली. कु. अर्चना, कु. आशा सक्सेना, देहजी म्हटले. त्यानंतर बंगालच्या मुलीने अत्यंत सुंदर तबला वाजवला.

कु. सोनिया सिंग 'जहाँ भी श्री माँ का स्थल हो वहा वहा मै जाऊ' हे भजन गायले. त्यानंत र श्री ॲकॅडेमिचे श्री शाम जैन यांनी रात्री १०.०० क्लासिकल गायला बसले. 'जिसदिन तुमको धावत, सहज शांती पावत' हे भजन गायले.

प. पू. श्री. माताजींचे रात्री १०.३० वा. पेंडॉलमध्ये आगमन झाले. त्यांनी बुट्ट्या असलेला शालु नेसला होता. त्यानंतर रात्री ११.०० च्या सुमारास धरमशाळांच्या मुलींनी, भरतनाट्यम, कुचिपुडी नृत्य, नंतरच्या ग्रुपने राग मालकंस सादर केला. धरमशाळातील मुलांनी श्री माताजींना प्रेझेंट सादर केली.

रात्री १२.३० च्या सुमारास ॲकॅडेमिचे श्री गुरुजी व्हॉयलिन वाजवायला बसले. त्यांनी राग 'मालकंस' वाजविला. श्री माताजींच्या समोर वाजवीत असल्याने व्हायब्रेशन खुपच सुंदर होती.

मध्यरात्रीनंतर प. अरविंद शिवजीकर हे सतार वाजविण्यास बसले. त्यांनी राग जयजयवंती वाजविला. शेवटी 'बिनती सुनिये आदी शक्ती मेरी' हे गीत सतारीवर वाजवले. शेवटी श्री माताजींच्या हस्ते सहजयोगाची माहिती असणाऱ्या उर्दु पुस्तकाचे प्रकाशन होऊन कार्यक्रम संपला.

**२७ डिसेंबर**

स्टेजच्या मागील सजावटीत मधोमध कमळ व दोन्ही बाजूस गजराज असे होते. श्री. अरुण गोयल यांनी सहज योगातील प्रोटोकॉल्सची माहिती दिली. रात्री संगीताचा कार्यक्रम झाला.

विशेष म्हणजे श्री माताजींच्या आदेशानुसार यंदाच्या गणपती पुळे सेमिनार मधे बिगर सहज योगी कलाकार कोणीही आमंत्रित नव्हता. सर्व गायन-वादन नृत्याचे कार्यक्रम सहजयोग्यांनीच सादर केले व त्याला चैतन्याची जोड होती.

सुरुवातीला ५ वर्षाच्या मुलीने 'हृदयम् समर्पयामी' या गीतावर डान्स केला. वेस्टर्न ग्रुप, कु. भाग्यश्री यांनी क्लासिकल गाणी गायली. श्री माँ तुम हमको दर्शन दिजीये, तुम जग जननी ही भजने झाली. त्यानंतर नॉयडा ग्रुपने ठेक्यातील गाणी गायली.

दिल्ली ग्रुपने राग बागेश्वरी गायला.

" चित्त सदा रहे माँ चरणमें

ध्यान सफल हो जायेगा

करो प्रार्थना शुद्ध हृदयसे

ध्यान सफल हो जायेगा- राग बागेश्वरी

वरील नवीन भजन अत्यंत सुंदर झाले. त्यानंतर दिल्ली शारदा ग्रुपने 'राष्ट्रीय एकता' बाबत लहानमुलांकडून अभिनय सादर केला.

त्यानंतर लखनौच्या सहजयोगी कलाकारांनी दोन पात्री 'इगो सुपर इगो' हे विनोदी नाटक सादर केले. त्या नाटकाचे नाव 'अंतर्दर्शन' होते. त्यामधून इगो सुपर इगो च्या बाधांमुळे होणारा त्रास वर्णन केला होता.

रात्री १२.०० च्या सुमारास बॅंगलोरच्या 'श्री शक्ती'ने राग भुप बासरीवर अत्यंत सुंदर वाजविला व कार्यक्रम संपला

**२८ डिसेंबर**

स्टेज मागील सजावटीत एका बाजूस बासरी, दुसऱ्या बाजूस हंडीतून पडणारे दही व मधोमध राधेचा अर्ध-चेहरा व मोरपीस. त्या दिवशीही संगीत व नृत्याचे कार्यक्रम सर्व सहजयोग्यांनीच सादर केले.

चेई सहजयोग्यांनी बोह रेढ- कोळी नृत्य- २०-२५ कलाकारांसह मेक अप- सेट सह सादर केले. त्यात स्टेजवर होडीचा प्रत्यक्ष सेट उभारला होता.

नंतर औरंगाबादच्या 'नृत्य झंकार' ग्रुपच्या श्रीमती मिरा पाउसकर आणि ग्रुपने भरत नाट्य, कुचिपुडी नृत्य प्रकार सादर केले. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे ब्रह्म स्तुती- दुर्गा स्तुती (राग शिवंजली) दशावतार, सिताहरण, ग्रुप डान्स, तरंगन इत्यादी अत्यंत आकर्षक कलात्मक पद्धतीने सादर केला.

ॲकॅडेमिच्या धनंजय धुमाळ यांनी सिंथेसायझर वर राग सरस्वती सुमारे तासभर वाजविला. नंतर श्री अरुण आपटे व वेस्टर्न सहजयोगी ग्रुप स्टेजवर गायला बसले. श्री अरुण आपटेंना वेस्टर्न सहजयोग्यांनी साथ दिली. या कार्यक्रमांत प्रत्येक चक्रांवर

संगीतमय भजन व मंत्र झाले.

१. राग शामकल्यान - मुलाधार चक्र

२. राग यमन - स्वाधिष्ठान (उजवे) चक्र (घर घर गाई माताजी)

३. राग तोडी - डावे स्वाधिष्ठान चक्र (बेगुन गुण गा)

४. राग अभोगी - नाभी चक्र (मंत्र)

५. राग मालकंस - भवसागर

६. राग दुर्गा - अनाहत चक्र ( जय जय हो महिमा)

७. राग जयजयवंती - विशुद्धी चक्र (मंत्र)

८. राग भूप - आज्ञा

९. राग दरबारी - सहस्त्रार.

अत्यंत प्रस वातावरणात भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली. त्यानंतर श्री माताजींचे संगीताबद्दल भाषण झाले व कार्यक्रम संपला.

**२९ डिसेंबर**

हा सेमिनारचा अंतिम दिवस. त्या दिवशी स्टेजवरील सजावटीत एका बाजूस शालू व शेल्याची गांठ दुसऱ्या बाजूस श्री गणेशांची प्रतिमा व मधोमध दोन हृदये व एक ज्योत. ही सजावट त्या दिवसाच्या लग्न समारंभास साजेशीच होती, ती खुपच सुरेख होती. त्या दिवशी सहज योगातील ७५ विवाह संपन्न झाले. सकाळी श्रीमाताजींनी चैतन्य-लहरी दिलेल्या हळदीचा कार्यक्रम झाला. संध्यकाळी श्री माताजींच्या चरण-पादुकांचे पूजन करुन सर्व वधूंनी गौरी पुजन केले. श्री माताजींनी संसाराबाबत व सहज योगातील लग्नाबद्दल मार्गदर्शनपर उपदेश केला. नंतर सहजयोग पद्धतीने सर्वांचे विवाह संप झाले. मंगलाष्टके म्हणण्यात श्री माताजीही सहभागी झाल्या. त्यानंतर वधू-वरांनी प. पू. श्री माताजींच्या समोर एकमेकांना घास देऊन नांवे घेतली. लग्न सोहळा फारच उत्तम रितीने व आनंदात पार पडला.

सेमिनारचा समारोप करताना श्री माताजींनी सेमिनारच्या आयोजनाबद्दल श्री. रावसाहेब यांचे प्रेझेंट देऊन खूप कौतुक केले, व सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. सहज प्रसार नवीन वर्षात खूप करण्याबाबत आशिर्वाद दिले व कार्यक्रम संपला.

सेमिनारची समाप्ति झाल्यावर सर्व सहजयोगी एकमेकांचा आनंदाने निरोप घेऊन समाधान व चैतन्य गाठी घेऊन आपापल्या गावासाठी रवाना झाले.

●●●



# ख्रिसमस पूजा

प. पू. माताजी श्री निर्मलादेवींचे भाषण, गणपति पुळे २५ डिसें. ९८

आज येशू ख्रिस्तांचा जन्मदिवस आहे. बऱ्याच शतकांपूर्वी आजच्या दिवशी त्यांचा जन्म झाला. त्यावेळची सर्व कथा तुम्हाला माहीत आहेच; त्यांना किती हाल भोगावे लागले हेहि तुम्ही जाणता. ख्रिस्तांचे जीवन हे आदर्श सहजयोगी कसा असावा याचे उत्तम उदाहरण आहे. ते स्वतःसाठी जगले नाहीत तर दुसऱ्यांसाठी जगले., आज्ञा चक्रावर त्यांनी कार्य केले. त्यावेळच्या जगामधील परिस्थिति अशी होती की तुम्ही संत असा किंवा फार मोठे सत्ताधारी असा, कुणाला अध्यात्म म्हणजे काय हे माहीत नव्हते व ते जाणण्याला कुणी तयार नव्हते. कारण अध्यात्मिकतेचा नाश करण्यामागे अनेक प्रवृत्ति असतात. संतलोकांचा नेहमी छळच केला गेला. तरीसुद्धा आपण त्यासाठी काय करु शकतो हे तुम्ही जाणून घ्यायचा प्रयत्न केला पाहिजे. ख्रिस्तांनी फार मोठे धैर्य करुन अशा देशांत जन्म घेतला जिथे कुणाला अध्यात्मिक कदर नव्हती. माझ्या पूर्वजांपैकी एकाने एक पुस्तक लिहीले आहे- ते संस्कृतमधे आहे म्हणून पाश्चात्यांना समजणार नाही व रुचणारही नाही- ज्यात ख्रिस्त भारतामधें आल्याची व त्यांची शालिवाहन बरोबर चर्चा झाल्याची हकीगत आहे. शालीवाहनने ख्रिस्तांना भारतात येण्याचे कारण विचारल्यावर त्यांनी सांगितले कि "इथे अध्यात्मिक गोष्टीना पूरक वातावरण आहे व त्या बद्दल आदर आहे आणि मी जिथे जन्माला आलो तिथे अध्यात्मिकतेचा लोक धिःकार करतात." त्यांची चर्चा पुढे रंगल्यावर शालिवाहनने ख्रिस्तांना पुन्हा त्यांच्याच देशात परत जाऊन निर्मल तत्त्व लोकांना समजावून सांगण्यास सांगितले. नंतर ख्रिस्त आपल्या देशांत परत गेले आणि साडे-तीन वर्षांनंतर त्यांना सुळावर चढवण्यात आले.

मला असे वाटते की पौर्वात्य आणि पाश्चात्य जीवनशैलीमधील मुख्य फरक असा आहे की पाश्चात्य देशांत कुणाला ठार मारणे ही फार मोठी कामगिरी समजली जाते. अगदी मामुली कारणावरुन कुणाला ठार करतांना त्यांना काहीच वाटत नाही; संतांचा छळ केला जातो किंवा त्यांना वेडे ठरवले जाते. भारतामध्ये संतांचा मान राखला गेला, त्यांनी सांगितलेल्या गोष्टी मान्य केल्या गेल्या; कांही दुष्ट लोकांनी त्यांच्या कार्यात विघ्ने आणली पण सर्वसाधारणपणे सामान्य लोकांनी संतांना स्वीकारले व त्यांचा मान राखला. इथेही कांही भोंदू गुरु होते पण ते पैसे मिळवण्याच्या प्रयत्नांत अमेरिकेसारख्या देशांत जाऊन तिकडेच राहिले. या कारणामुळेच ख्रिस्तांनी अगदी गरीब कुटुंबात जन्म घेतला. त्यांचे आईवडील साध्या गोठ्यामधें हलाखीच्या स्थितीमध्ये रहात होते, त्यांच्याजवळ झोपण्यासाठीही गादी-कापड असे काही नव्हते. ही सर्व हकीगत लिहून ठेवलेली आहे. याच्यामधून हेच दिसून येते की अध्यात्मिक उच्च पातळी गाठलेल्या लोकांना ऐहिक गोष्टींची गरज नसते. त्यांना थाट-माट देखावे करण्याची गरज नसते. ख्रिस्तांना तर रंजल्या-गांजलेल्या, हालअपेष्टा भोगणाऱ्या, आजारी अशा लोकांची काळजी व चिंता होती; त्यांनी कुष्ठरोग्यांनाही औषधे देऊन त्यांची सेवा केली, त्याकाळी डॉक्टर नव्हते, हॉस्पिटल नव्हते म्हणून याची जरुरी होती. त्याचप्रमाणे त्यांना लोकांची मानसिकता उंच पातळीवर आणायची होती म्हणून त्यांनी डोंगरावर जाऊन लोकांना उपदेश केले; त्याकाळचे लोक भौतिकतेमधे इतके अडकलेले नसल्यामुळे त्यांचे सांगणे ऐकायचे; किती जणांना समजत होते ही वेगळी गोष्ट. कारण आत्मसाक्षात्काराशिवाय अध्यात्मिक विचार समजणे कठीण असते. या गोष्टी सांगणारा व ऐकणारा अशा दोघांनाही आत्मसाक्षात्कार थोडफार तरी असायलाच हवा. म्हणून आपण प्रथम हे लक्षांत ठेवले पाहिजे की आपल्याला आत्मसाक्षात्कार नसेल तर आपण ख्रिस्तांच्या आत्म्याला दुःखी करु. हे प्रत्यक्ष झालेले आपण पाहिलेच आहे.

ख्रिस्तांबद्दल बोलणारे लोक त्यांनीच सांगितलेली गोष्ट विसरतात आणि ती म्हणजे ते म्हणायचे " तुम्ही मला Christ, Christ म्हणून हाका मारल्यात तर मी तुम्हाला ओळखणार नाही."बायबलामधून हा भाग का काढला गेला मला समज नाही. त्याचा अर्थच हा आहे की जे लोक फक्त चांगले कपडेलत्ते करुन मंदिरांत येऊन माझे नाव घेतील त्यांना मला ओळखता येणार नाही. इतकी ही साधी गोष्ट आहे आणि आताच्या या Last Judgement च्या काळी ख्रिस्त सर्व मानवांना अध्यात्मिक पाळीवरच, म्हणजे व्हायब्रेशन्सवर, पारखणार आहेत. हे जज्जमेंट चालूच झाले आहे. अनेक देशांमधे ते दिसुन येत आहे, विविध लोकांचा अहंकार, आक्रमकपणा यांना आव्हान केले जात आहे आणि ज्यांनी

ज्यांनी विध्वंसक कार्ये केली त्यांना जबाब द्यावा लागत आहे. इतिहासामधून हेच दिसते की ज्यांनी ज्यांनी दुसऱ्या देशांना, दुसऱ्या लोकांना त्रास दिला त्यांना आव्हान दिले जात आहे. कारण त्यांना अशा तऱ्हेने लोकांना त्रास देण्याचा काहीही अधिकार नव्हता. हे श्री गणेशतत्त्वच आहे. आणि तेच सहजयोगामधून व्यक्त होत आहे. ख्रिस्त असे प्रत्यक्ष बोलले नव्हते पण हा लास्ट जजमेंटचा काळ आहे हे त्यांनी निक्षुन सांगितले होते. एका बाजूने ते दयाळु व करुणामय होते तर दुसऱ्या बाजूने ते साक्षात गणेशच होते. म्हणूनच त्यांनी मंदिरात व्यापार करणाऱ्या लोकांना हंटर घेऊन झोडपले. धर्माच्या नावाखाली तुम्ही धंदा करु शकत नाही. पण ख्रिश्चन लोकांनी ते पाळले नाही. त्यांना काय झाले होते कळत नाही. आमच्याकडे श्री. गांधी सतत अध्यात्माबद्दल बोलत असत. पण जे स्वतःला गांधींचे अनुयायी म्हणत असत त्यांनी त्यांचे नुसते पुतळे उभारले आणि स्वतः वेगळ्याच गोष्टी व वेगळाच जीवनक्रम यांत रमून गेले; इतके की त्यांच्यापैकी काहीजणांनी मिनि पब्स सुरु करण्याची टुम काढली; आणखी काही विचित्र कल्पना त्यांनी डोक्यांतून काढल्या. स्वतःला कॉंग्रेसचे म्हणवुन घेता घेता याच लोकांनी नसते उद्योग सुरु केले. अध्यात्म हा या देशाचा आत्मा आहे पण हे लोक कुठे भरकटत चालले आहेत? काही लोक स्वतः ख्रिश्चन नसले तरी ख्रिस्तांचा आदर करतात, बायबलचा आदर करतात, तुम्हाला हे माहीत नसेल पण ही खरी गोष्ट आहे. त्यांनी बाप्तिस्मा घेतला नाही म्हणून फक्त ते ख्रिश्चन नाही एवढेच; पण ते ख्रिस्तांना मानतात कारण ख्रिस्त म्हणजे मूर्तिमंत अध्यात्म होते. भारताचे हे वैशिष्ट्य आहे की इथे हिंदू-मुस्लिम असा भेदभाव न ठेवता सुफी संतांचाही आदर राखला गेला. म्हणून ख्रिस्तांबद्दल इथे कुणाचा विरोध नाही. काल इथे ख्रिस्तांवर सुंदर गाणी तुम्ही ऐकलीत. ते साक्षात्कारी कलाकार होते. पण साक्षात्कार मिळाला नसला तरी इथे ख्रिस्तांना मानतात. त्या लोकांना ख्रिस्त कसे समजणार? त्यांच्या जीवनांतून ते काय बोध घेणार? उलट ख्रिस्तांबद्दल काहीही वाटेल ते बोलायचे हे मला सहन होत नाही. इथे अध्यात्माचा बाहेरच्या लोकांपेक्षा आदर राखला जातो. तिकडे ख्रिस्तांच्या नावाखाली अनेक चुकीच्या गोष्टी केल्या जातात, अनेक पापे केली जातात आणि इतके असूनही ख्रिस्तांचे मोजमाप ते करायला धजावतात हे न समजण्यासारखे आहे. कुणी जन्माला आला तर ड्रिंक घेऊनच साजरा करणे, कुणी मरण पावला तरीसुद्धा ड्रिंक घ्यायचे याला काय म्हणावे? मी एकाला तसे म्हटलेही तर म्हणाला, ख्रिस्तांनीच एका लग्न-समारंभात दारु बनवून लोकांना वाटली. हे कसे शक्य आहे? उलट त्यांनी त्या प्रदेशात द्राक्षे खूप असायची म्हणून द्राक्षांचा रस (द्राक्षासव) बनवला होता. त्याला ड्रिंक कसे म्हणतात? दारु बनवण्यासाठी कुजवून, उकळून बनवावी लागते; तिथे दारु कशी होऊ शकते? पण ड्रिंक घेणे हा त्यांनी धर्मच मानला होता.

पण इथे तसे नाही; कुणी ड्रिंक घेण्याबद्दल बोलले नाही तरी ड्रिंक घेणे हे धर्माविरुद्ध आहे हे सर्वजण जाणतात. दारु पिण्याने मनावर दुष्परिणाम होतात हे सर्वजण मानतात पण त्यासाठी भाषणे करण्याची जरुर पडत नाही कारण सर्वांनीच ते निषिद्ध आहे हे जाणले आहे. आता अलिकडे आपल्या देशांतही ते लोण आले आहे आणि पुष्कळजण त्याकडे सरळ सरळ वळले आहेत. पार्टी असली की ड्रिंक हवेच, ख्रिसमस दिवस म्हणून ड्रिंक हवेच असेही प्रकार चालले आहेत. हा त्या पवित्र सुंदर आत्म्याचा अपमानच आहे. बहुधा हे लोक जन्माला आले तेव्हाच ते धर्माची शक्ति गमावून बसले. भारतात एक गोष्ट अजून चांगली आहे व ती म्हणजे इथे पावित्र्याबद्दल आदर राखला जातो. साधुपणाबद्दल अजून लोकांच्या मनात पूज्यभाव आहे. ही एक चांगली गोष्ट आहे. आता हे लोकही अलिकडे मॉडर्न बनण्याच्या, अमेरिकन लोकांसारखे वागण्याच्या फॅशनच्या मागे लागले आहेत ही गोष्ट वेगळी. पण तरीही चांगले काय व वाईट काय, बरोबर काय व चुकीचे काय ही जाण अजून त्यांच्यामधे आहे.

आता सहजयोगांत आल्यापासुन बरीच सुधारणा होत असल्याचे मला फार समाधान वाटते. विशेषतः पाश्चात्य सहजयोग्यांचे तर मला विशेष कौतुक वाटते कारण त्यांच्या संस्कृतीमधे अध्यात्मिकतेला काहीच महत्त्व नसुनही त्यांनी पूर्वायुष्यातील सर्व वाईट सवयी सहजयोगात आल्यावर टाकून दिल्या एवढेच नव्हे तर कमळरुपी अध्यात्मिक सुगंध पसरवणारे सुंदर सहजयोगी ते बनले. हा एक चमत्कारच म्हणायला हवा. कित्येकजण मला म्हणतात "माताजी, हे तुम्ही कसे घडवून आणले? हे लोक इतके कसे बदलले?" मी एवढेच म्हणेन की त्यांना ख्रिस्तांचे आशीर्वाद मिळाले आहेत म्हणून. ख्रिस्तांच्याच नावाखाली चाललेल्या अनेक वाईट गोष्टी पाहून ते विटले, ख्रिस्तांची बदनामी करणारे हे चाळे पाहून त्यांच्या बुद्धीत एक जाणीव निर्माण झाली की ख्रिस्त असे असणे शक्य नाही, ख्रिस्तांचे पावित्र्य यांच्यामधे दिसत नाही, हे सर्व चुकीचे असले पाहिजे. म्हणूनच मला वाटते की अध्यात्मिक उंती मिळवण्याची ओढ या पाश्चात्य लोकांजवळ अधिक प्रकर्षाने असावी. काल कुणीतरी मला म्हणाले की इथे सामुहिक ध्यान झाले नाही. हे ऐकुन मला फार समाधान झाले.



सहजयोगामध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ध्यान. पण आश्चर्य हे की पाश्चात्य सहजयोगी भारतीयांपेक्षा जास्त ध्यान करतात; त्यांच्या महिला आणि पुरुष या दोघांनीही सहजयोगाचे बरेच ज्ञान मिळवले आहे. अमेरिकेत मला सहजयोगी म्हणाले की अमेरिकन योगी सहजयोगाला चांगले नाहीत कारण ते ध्यान करत नाहीत. पण हे अगदी बरोबर आहे, **जे ध्यान करत नाहीत त्यांना सहजयोगी म्हणताच येणार नाही.** त्या लोकांनी अमेरिकन योग्यांकडून ध्यान करवून घेतले. उलट रशियन, रुमानियन सहजयोगी खुप चांगले आहेत, त्यांनी सहजयोग कसा स्वीकारला हेच मला कळत नाही. मला वाटते की कम्युनिस्ट वर्चस्वाखाली बरेच वर्षे राहिल्याने त्यांना आपण कशाला तरी मुकलो आहोत ही जाणीव झाली. मग त्यांनी अंतरंगापासून खुप शोध घेतला आणि म्हणून ते सहयोगातील शक्ति व सुक्ष्मता मिळवू शकले.

**म्हणून मला भारतीयांना आवर्जून सांगावेसे वाटते की त्यांनी ध्यान जास्त केले पाहिजे.** भारतीयांमध्ये एक-दोन वाईट दोष आहेत; एक म्हणजे **ग्रुप बनवून रहायची सवय त्यांना फार आहे.** आपापसांतही कायस्थ, मारवाडी, ब्राह्मण असे ग्रुप करुन राहतील, ते जमले नाही तर आणखी कुठल्या सबबीखाली ग्रुप बनवतील. ही फार वाईट सवय आहे, कारण **एकदा अशी ग्रुप बनवायची सवय लागली की दुसऱ्या- मधल्या चांगल्या गोष्टी तुमच्या लक्षात येणार नाहीत आणि स्वतःमधले दोषही तुम्ही जाणू शकणार नाही, ही अगदी नुकसानकारक सवय आहे.** ख्रिस्तांच्या समयीसुद्धा काही विचित्र शिष्य होते, त्यांच्यात अध्यात्मात रस असणारे व नसणारे असे प्रकार होते. इथल्या लोकांत अध्यात्मिक प्रवृत्ति असणारे लोक आहेत पण त्यांचा एक पाय अजून पाण्यातच आहे; त्यांच्या वर्षानुवर्षांच्या प्रवृत्ति व सवयी अजून जात नाहीत आणि हीच सहजयोगासाठी घातक गोष्ट आहे. ते एकत्र येऊ शकत नाहीत, एकमेकांत मैत्रीपूर्ण राहू शकत नाहीत. अर्थात सहजयोगात जे आले त्यांच्या या सवयी बऱ्याच सुटल्या आहेत. ख्रिस्तांच्या वेळचा काळ पाहिला तरी हे दिसते की त्यांच्या शिष्यांमधेही हे प्रश्न होते. काहीतरी चुकीच्या गोष्टी केल्या तर तेच सांगायचे की तुम्हाला सैतान शिक्षा देणार आहे. लोक बरेच वेळा या सैतानी प्रवृत्तीच्या प्रभावाखाली येतात. ख्रिस्तांनी बऱ्याच जणांना या सैतानी शक्तिपासुन वाचवले आणि खड्ड्यांत बसवले ही सत्य गोष्ट आहे. ही सैतानशक्ति अजुनही कार्यरत आहे आणि आपण जितकी अध्यात्मिक स्थिती बळकट करु पाहतो तितकीच ही शक्ति जास्त प्रभावी होत असते. पाश्चात्य व पौर्वात्य देशांत या शक्तीचे स्वरुप वेगवेगळे आहे. यासाठी पाश्चात्यांनी जास्त जागरुक रहायला हवे, ही शक्ती त्यांना ओळखता येण्यासाठी जागरुक असले पाहिजे. ते साक्षात्कारी असल्यामुळे ही शक्ती त्यांचे वैयक्तिक नुकसान करू शकणार नाही पण त्यांना या शक्तीबरोबर नेहमी झुंज करावी लागेल. तुमच्याकडे वर्णभेद अजूनही फार पाळला जातो, त्याच्या विरोधात आंतरवर्णीय विवाह झालेल्या पुरुष-स्त्रियांनी कार्य केले पाहिजे. आपल्याकडे मला अजूनही काळ्या व गोऱ्या मुलामुलींचे एकमेकांशी लग्न जमवण्यांत अडचणी येतात. ते जरा कठीणच आहे आणि तसे जमवले तर काय पुढे होईल याची मला खात्री वाटत नाही. एकदा मी एका गोऱ्या फ्रेंच मुलीचे एका काळ्या वर्णाच्या मुलाशी लग्न जमवले. पण लग्नानंतर मला कळले की त्या मुलीने नवऱ्यावर अधिकार गाजवण्याऐवजी तो मुलगाच तिच्यावर वर्चस्व गाजवत होता. मला याचे आश्चर्य वाटले पण नंतर समजून आले की तो काळा पुरुष आपल्यावर गोऱ्या लोकांनी केलेल्या अन्यायाचा सूड म्हणून गोऱ्या बायकोबरोबर तसेच वागत होता. म्हणून सर्वप्रथम सर्व लोकांमधे प्रेमाची व आपुलकीची भावना रुजली पाहिजे. वर्ण हा वरवरच्या कातडीपुरताच आहे आणि त्याचा माणसाच्या अंतरंगाशी काही संबंध नाही. आमच्या देशात लग्ने ठरवताना हा वर्णभेद फारसा आड येत नाही. अगदी काळ्या मुलीचा नवरासुद्धा गोरापान असलेला दिसुन येतो. पण त्याकडे अशा दृष्टीकोनांतून बघत नाही. आमच्याकडे एक वेगळाच भेदभाव केला जातो व तो

म्हणजे सामान्य माणसामधे असलेले भेदभाव व वेगळे-वेगळे समजण्याची वृत्ती. हे अहंकारातून होते. ख्रिस्तांनी लोकांना अहंकाराबरोबर युद्ध करुन ती संपवण्यास सांगितले. त्यांचा जन्म अगदी गरीब कुटुंबात झाला, त्यांचा वर्ण सावळा होता- पाश्चात्य भाषेप्रमाणे Brown आणि आमच्याप्रमाणे काळा - पण त्यांच्यासारखे अध्यात्मिक थोर पुरुष जगामधील प्रकाशाकडे बघतात. चेहऱ्या मोहोऱ्याकडे, रंगाकडे बघत नाहीत. वर्णभेदाचा हा दोष पूर्णपणे काढून टाकला पाहिजे. भौतिकता हा त्यांचा आणखी एक दोष. पण त्याहून वाईट व हानिकारक दोष म्हणजे नितिमत्तेचा अभाव. ही गोष्ट ख्रिस्तांच्या अगदी विरोधात आहे. कसल्याही तऱ्हेचे नितीविरुद्ध वर्तन तिथे कुणी वाईट मानत नाहीत, अयोग्य मानत नाहीत. मग अगदी प्रेसिडेंटसारख्या सर्वोच्च पदाधिकारी असला तरी त्याला बहुमत देऊन निर्दोष मानले जाते. लोकांनी हे समजून घेतले पाहिजे की अनीति ही त्यांना शेवटी नरकातच पोचवणार आहे. अनीतिमत्ता ही सर्वार्थाने ख्रिस्तांच्या विरोधी प्रवृत्ति आहे. याच कारणामुळे फ्रॉइडसारखे लोकही त्यांनी वाखाणले, याचा अर्थच हा की लोकांची खोपडीच रिकामी!

सहजयोगात आल्यावरच ख्रिस्तांचे आदर्श तुम्ही अनुकरण करु शकाल. त्याआधी तुम्ही काय केले ते सर्व विसरुन जा पण आता आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर नितिमित्ता हाच तुमचा श्वास समजा. माझी खात्री आहे की तुम्ही आणखी खूप लोकांना सहजयोग देऊ शकाल, फक्त तुमचे चारित्र्य व जीवन नितीयुक्त असले पाहिजे.

आपला आणखी एक शत्रू म्हणजे राग. "मला राग आला आहे, मी फार रागावलो आहे" असे म्हणणे हे उद्धटपणाचे व चुकीचे आहे. तसेच "आय् हेट यू" ही भाषा रागीटपणाचाच दोष आहे. खरं तर स्वतःवरच रागावणे हा चांगला उपाय आहे. मग त्यासाठी स्वतःला मारा, किंवा तसेच आणखी काही करा पण राग घालवायचा तोच एक उपाय आहे. आपण का रागावलो आहे हे पहाण्याचा प्रयत्न केला तर तुमच्या लक्षात येते की तुम्हाला रागावण्याची जरूरच नव्हती किंवा तुम्ही उगीचच रागावला होता. जोपर्यंत 'मी रागावलो आहे' ही भावना कमी होत नाही तोपर्यंत तुम्ही उन्नतीच्या मार्गाविरूद्ध चालला आहात हे लक्षात ठेवा.

ख्रिस्तांनी आणखी बऱ्याच सूक्ष्म गोष्टींबद्दल लोकांना जाणून -बुजून सांगितले नाही, ते काम माझ्यासाठी राहिले होते. आत्मसाक्षात्कार प्राप्त झाल्याशिवाय या सूक्ष्म गोष्टी कुणाला सांगणार? ते शक्य नाही. गेल्या वेळी मी व्हायब्रेशन्सबद्दल बोलले; त्यांचा अर्थ समजाऊन सांगितला आणि ही सूक्ष्म शक्ती तुम्हाला कुठून मिळते- तिला तन्मात्रा म्हणतात- हे सांगितले. या तन्मात्रा म्हणजे पृथ्वी, जल, वायू, अग्नी इ.पासून मिळणारी शक्ती पण आणखी एका तन्मात्रेबद्दल बोलले नव्हते, त्याला इंग्रजीत Ether म्हणतात आणि त्याला नियंत्रित करणाऱ्या तन्मात्रेला आपण आकाश म्हणतो. ख्रिस्तांनी आपले आज्ञाचक्र उघडण्यासाठी एवढा मोठा स्वार्थत्याग केला आणि आज आपण त्यामुळेच आकाश-स्थितीला आलो आहोत. त्यांच्याशिवाय हे होणे अशक्य होते. आपण साधारण संपर्कक्रिया जाणतो. उदा. हात, बोलणे, हावभाव इ.मधून आपण संपर्क साधतो पण व्हायब्रेशन्सद्वारे संपर्क होण्यासाठी आधी तुम्हालाच व्हायब्रेशन्स हव्यात. त्याशिवाय तुम्ही काही दुसऱ्याकडून जाणू शकणार नाही. **तुम्ही आज्ञा-चक्रावर असता तेव्हा मानसिक पातळीवर असता. त्यामुळे तुम्हाला व्हायब्रेशन्स नीट समजणार नाहीत इतकी ती क्षीण असतात आणि त्यांचा संदेश तुम्ही समजू शकणार नाही. म्हणजे व्हायब्रेशन्सही तुमच्या मानसिकतेमधूनच येतात.** पुष्कळांना 'मी व्हायब्रेशन्सवर बघितले' असे बोलण्याची सवय असते पण त्याला अर्थ नाही. ख्रिस्तांनी केलेले महान कार्य म्हणजे त्यांनी आपल्याला मानसिक पातळीच्या बाहेर आणले. पण ख्रिश्चन लोक मात्र घाणेरड्या मानसिक स्थितीमध्येच अजून आहेत हे दुर्दैव. मानसिक पातळीवरच, दिल्लीमधल्या धुक्यासारखे. म्हणून त्यांना पुढचे काही कळत नाही आणि हेच ख्रिस्तांचे महान कार्य आहे. मानवप्राण्याच्या उत्थानामधील हा सर्वात मोठा अडथळा त्यांनी दूर केला आणि आज्ञा चक्र उघडून देऊन मानवाला मानसिक पातळीवरून पुढे येण्याचा मार्ग उघडा केला. आपल्या मानसिक 'मी'पणातून बाहेर काढले. केवढे महान उपकार त्यांनी केले! आपण त्यांचे खूप ऋणी राहिले पाहिजे. काही लोकांना हे कार्य समजत नाही. ते त्यांच्या बुद्धीचेच प्रदर्शन करत राहतात. पुस्तकी विद्येचा आव आणतात पण अशा लोकांच्या डोक्यात ख्रिस्तांचे हे कार्य येणार नाही. त्यांच्याशी न बोललेलेच बरे. यासाठीच आपण ख्रिस्तांची पूजा करतो. लोकांमधील या मानसिक 'अहं'पणामुळेच त्यांनी काहीही केले तरी 'त्यात काय चुकले' असे त्यांना वाटत असते. इतका त्यांच्या बुद्धीचा अहंकार असतो. असे लोक सुधारणार नाहीत. कारण जोपर्यंत तुम्ही तुमच्याच मानसिक 'मी'पणामधून बाहेर पडत नाही तोपर्यंत तुम्ही स्वतःला पाहू शकत नाही, आत्मपरीक्षण करू शकत नाही, स्वतःचे दोष जाणू शकत नाही. मग तुम्ही दुसऱ्यांचेच दोष दाखवत रहता; दुसऱ्या सहजयोग्यांच्या चुका दाखवत राहता पण स्वतःकडे बघू शकत नाही कारण हा मानसिक पडदा तुम्हाला अडथळा आणतो. हा मानसिक अडथळा लॉर्ड जीझस ख्राइस्टची मदत व आशीर्वाद

मिळवून आपण पूर्णपणे दूर केला पाहिजे. पण तुम्हीसुद्धा ख्रिस्तांना तुमच्या मानसिक पातळीवरच समजावून घेऊ लागलात तर काय करणार? म्हणून सर्वप्रथम आपल्याला स्वतःलाच "विचार करू नको. विचार करू नको, विचार करू नको, विचार करू नको" असे वारंवार बजावले पाहिजे. त्यानंतरच तुम्ही मानसिक पातळीच्या पलीकडे (पार) जाऊ शकाल. हीच सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. आपल्या आज्ञाचक्रावर ख्रिस्त त्यासाठीच बसले आहेत, तेच तुम्हाला त्यासाठी मदत करत असतात. मला वाटते लोकांनी वाचनही बंद केलेले बरे; माझी भाषणेही ते मानसिक पातळीवरूनच ऐकतात मग काय करायचे? मला काही सहजयोगी विचारतात, "माताजी, तुम्ही अमुक अमुक असेच सांगितले होते ना?" मग मला म्हणावे लागते, "मी तुम्हाला निर्विचारता मिळवण्यासाठी भाषण केले होते, तरी तुम्ही विचारात कशाला राहता? मी म्हटले नव्हते की तुम्ही लक्ष देऊन ऐका, स्वस्थ बसून त्याच्यावर चिंतन करा, विश्लेषण करा, मी फक्त तुमचे विचार थांबतील असा शॉक दिला."

म्हणून निर्विचार होणे ही तुमच्यासाठी फार महत्त्वाची गोष्ट आहे. त्यासाठीच ख्रिस्तांनी तुम्हाला आशीर्वाद दिले आहेत आणि ही स्थिती तुम्ही मिळवाल याची मला खात्री आहे. **दुसऱ्यांकडे अजिबात लक्ष देऊ नका, प्रतिक्रिया करण्याच्या फंदात पडू नका;** प्रतिक्रिया ही तुमच्या भूतकाळामुळे व्यक्त होत असते हे मी वारंवार सांगते, ती नुसती पाण्यावरच्या लाटेसारखी आहे म्हणून त्याचा काहीही फायदा नाही. ही पूजा झाल्यावर तुम्हाला अगदी पूर्णतया निर्विचार व्हायचे आहे आणि तसे तुम्ही झालात तर खूप काही साध्य केले असे म्हणता येईल. ख्रिस्तांचे हे तुमच्यावर फार फार उपकार आहेत याची जाणीव ठेवा. मग तुमच्यामधील आकाशतत्त्व कार्यान्वित होईल व ते तुमच्या चित्तामधूनच कार्य करेल. मी माझ्या चित्तामधून बरेच काही करते हे तुम्हाला माहीत आहे; पण माझ्या चित्तात विचार नसतात. त्यामुळे जिथे जायचे तिथे ते पोचू शकते. तुमचे चित्त **(attention)** जर तुमच्या विचारांकडे लागले असेल तर मग त्याला जे करायचे असते ते ते करू शकत नाही. चित्तामधून फार मोठ्या प्रमाणावर आश्चर्यचकित होण्याइतके कार्य घडू शकते. पण त्यासाठी प्रथम पूर्ण निर्विचार स्थिती मिळवली पाहिजे. असे चित्त मग तुमच्याहून आणि इतरांच्याहून एका मानवी उच्च जाणिवेच्या स्थितीला येते आणि तुम्ही आकाशाच्या संपर्कात येता. (यालाच तन्मात्रा किंवा essence of ether म्हणतात. इथरचा उपयोग करूनच टेलिफोन, टीव्ही. इ.चे कार्य चालते, हाही तसा चमत्कारच आहे. या तन्मात्राद्वारेच इथे नुसते बसूनही तुम्ही कार्य करू शकता, जिथे तुमचे अटेन्शन् जाईल तिथे कार्य होईल. मग मला विचारण्याचीही तुम्हाला जरूर पडणार नाही आणि तुम्हाला कसला प्रश्न पडणार नाही. मग पृथ्वी-तत्त्व, अग्नी-तत्त्व, जल-तत्त्व यामधून तुम्ही तेजस तत्त्वामधून व्यक्त होऊ लागता, तुमचा चेहरा तेजस्वी होतो आणि सरतेशेवटी तुम्ही जागृत निर्विचारावस्थेला (thoughtless awareness) पोचता जिथे तुमचे चित्त काही विशेष कार्य करण्यासाठी संपूर्णपणे स्वतंत्र झालेले असते. पण तुमचे चित्त जर विचारांमध्ये गर्क असेल तर ते तरी काय करणार? स्वतंत्र झाल्यावर मग माझे चित्त लावण्यासाठीही मला सांगण्याची जरूर तुम्हाला पडणार नाही, जिथे तुम्ही चित्त लावाल तिथे कार्य घडून येईल. चित्ताला अशी स्थिती आल्यावर तुमच्याजवळ काय आहे; तुम्ही काय कपडे घातले आहेत, दुसऱ्यांनी काय पेहराव केला आहे इ. असले विचार तुमच्या मनातच येणार नाहीत कारण तुम्ही आत्म्याबरोबर पूर्णपणे एकरूप झालेले असता. यावेळी तुम्ही आनंद, समाधान, शांती यामध्ये इतके तल्लीन असता की माणसांच्या सामान्य गोष्टींचीही तुम्हाला फिकीर वाटेनाशी होते.

आता सहजयोग दूरदूरच्या देशात पसरला आहे. तुम्ही लोक कार्य करत आहात याचा मला अभिमान आहे. अलिकडे तर आफ्रिकन देशातही सहजयोग सुरू झाला आहे याचे मला फार फार समाधान आहे. आता **तुम्ही सर्वजण, अगदी प्रत्येकजण हे कार्य करण्यास समर्थ आहात. तुम्ही फक्त जागृत निर्विचारावस्था मिळवली पाहिजे हेच ख्रिस्तांचे आपल्याला आशीर्वाद आहेत. ते झाल्यावर तुम्हाला आनंदच आनंद मिळणार आहे.**

**परमेश्वराचे तुम्हा सर्वांना अनंत आशिर्वाद**

(पुढील भाषण हिंदीमधून झाले.)

भारतामध्ये इंग्रजी भाषा तीनशे वर्षांपूर्वी आली. मी हिंदी भाषा कधीच शिकले नाही. लहानपणी वडिलांनी शाळेत घातले ती मराठी शाळाच होती. म्हणून संस्कृत व हिंदी शिकण्याची वेळच आली नाही. पण माझे एक वैशिष्ट्य म्हणजे मी हिंदी बोलते तेव्हा फक्त हिंदीच भाषा वापरते, इंग्रजी बोलते तेव्हा फक्त इंग्रजी भाषाच वापरते आणि मराठी बोलते तेव्हा फक्त मराठीच भाषेत बोलते. त्यामुळे भाषांतर हा प्रकार मला कधी जमला नाही म्हणून भाषांचे मिश्रण माझ्याकडून होत नाही. कुणाचा विश्वास बसणार नाही पण मी कधीच हिंदी भाषा शिकले नाही. पण वाचनाची आवड होती. चांगली चांगली पुस्तके वाचून मला हळूहळू ती भाषा कळू लागली. तशी मराठी भाषाही संस्कृतप्रचुर व क्लिष्ट; महाराष्ट्रीय माणूस हिंदी बोलतो तेव्हा त्यात अर्धे मराठी व बाकी संस्कृत शब्द वापरतो. तसे

पाहिले तर भाषा हेसुद्धा एक वरदानच असते, संगीताप्रमाणे तेही एक वरदान असते. पण नवल म्हणजे हिंदी भाषिक हिंदीशिवाय दुसरी कुठलीही भाषा बोलू शकणारच नाहीत. तीच गोष्ट इंग्रजी भाषेची, त्यांनाही दुसरी कुठली भाषा येत नाही. कारण सगळीकडे इंग्रजी चालते म्हणून त्यांना दुसरी भाषा शिकण्याची जरूर नाही. त्याप्रमाणेच हिंदी लोकांना दुसरी कुठली भाषा चालत नाही; मी मराठी शिका असे म्हणणार नाही कारण ती शिकायला फारच कठीण. मराठी भाषा विनोद-प्रचुर आहेच पण त्यात अश्लीलता नाही. उलट ती एक प्रगल्भ भाषा आहे. मी तर म्हणेन की सहजयोगासाठी मराठीसारखी दुसरी भाषाच नाही. कुण्डलिनीबद्दल जे काही लिहिले आहे तेही मराठीमध्येच आहे. साधुसंतांनीही सर्व मराठीतच लिहिले. ज्याला मराठी भाषा आली त्याला दुसरी कोणतीही भाषा अवघड नाही. पण मराठी बोलणारे लोक भाषेबद्दल फार कट्टर आहेत. मी कुणाला तरी हिंदी पुस्तक वाचायला दिले तर थोडेसे वाचून त्याने ते बाजूला टाकले. कारण विचारले तर म्हणाला ही भाषा फार बेकार वाटते. मराठी भाषा आणि त्यातले विचार फार शुद्ध वाटतात. पण शिकायला मराठी भाषा फार अवघड; कारण त्या भाषेमध्ये पर्याय खूप आहेत. मी मुंबईत प्रोग्राममध्ये हिंदीतून बोलत असले तरी पुण्यामध्ये मराठीच बोलावे लागते. ज्याला परकी भाषा शिकायचे असेल त्याने मराठीच शिकावी; ती खरोखरच शिकण्यासारखी भाषा आहे. तुम्हाला मराठी एकदा आली की तामीळ भाषेशिवाय दुसरी कोणतीही भाषा तुम्ही सहज शिकू शकाल. भारतात सरकारमान्य अशा चौदा भाषा आहेत आणि एकदा मराठी शिकलात की चौदापैकी आठ-नऊ भाषा तर सहज शिकता येतील.

आणखी एक कमालीची गोष्ट म्हणजे इथे मूळ हेब्रू भाषेतील बायबलचे मराठीत भाषांतर झाले आहे. इथे रमाबाई नावाची विद्वान महिला होती. तिने हे काम केले. त्यासाठी मराठी शब्दही अचूक वापरले गेले आहेत. उदा. 'जॉन'ला योहान,' 'मॅथ्यूस'ला मत्तल असे शब्द वापरले आहेत. हे भाषांतरही अतिशय सुंदर झाले आहे आणि मी प्रथम बायबल वाचले ते हे मराठी बायबलच. त्यातच त्यांनी स्वच्छ लिहिले आहे की एका लग्नसमारंभात येशूने पाण्यापासून द्राक्षासव बनवले. ही फार तत्त्वपूर्ण गोष्ट आहे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे येशूच्या बालपणाबद्दलही त्यात लिहिले आहे. एरवी कुठेही येशूच्या बालपणाचे उल्लेख आढळत नाहीत, पण या पुस्तकात आहेत. कालच इथे या लोकांनी ''बालवदन तव बघुनी' हे गाणे म्हटले पण तसली गाणी व गोष्टी दुसऱ्या भाषेत मला कुठे दिसत नाहीत. आमच्याकडे कृष्ण, राम इ.सारख्या सर्व महापुरुषांच्या बालपणाच्या, ते कसे चालायचे, बोलायचे, तोंडात बोट कसे घालायचे इ.पासूनच्या खूप कहाण्या वाचायला मिळतात. साऱ्या अवतारांच्याच बालपणाच्या खूप हकीगती व गाणी भारतात लिहिल्या गेल्या. दुसरीकडे हे कुठे दिसत नाही. म्हणूनच मला वाटते की भारतीय लोक आपली मुले दूर ठेवायला तयार नसतात. आणखी एक गोष्ट सांगायची म्हणजे भारताबाहेर रोमान्सच्या सर्व हकीगती व पुस्तके लग्नाआधीच्या प्रसंगांतून वाचायला मिळतात, लग्नानंतर पुस्तकात रोमान्स सापडतच नाही. भारतात याच्या बरोबर उलट, इथे पुस्तकांतून रोमान्सबद्दलची जी वर्णने असतात ती विवाहित स्त्री-पुरुषांबद्दल असतात आणि तीही फार सुंदर भाषेमध्ये असतात. मी कुणाला तरी विचारले की लग्नानंतरच्या रोमान्सबद्दल लिहिलेले पुस्तक दाखव. पण नाही त्याबद्दल कुठेही लिहिलेले नाही. जणू लग्नानंतर त्यांचा रोमान्सच संपतो! तिथे होते काय तर लग्नानंतर भांडण-तंटण नाही तर घटस्फोट! हेच आमच्या संस्कृतीचे आमच्यावर फार मोठे उपकार आहेत. तर बायबल मी प्रथम मराठीत वाचले. इंग्रजी बायबलमध्ये तर बायबलचे पूर्ण स्वरूपच बिघडवून टाकले आहे. ख्रिस्तांचे पावित्र्य, त्यांची अध्यात्मिक पातळी याबद्दल जे वर्णन मराठी बायबलमध्ये आहे ते हिंदीतही नाही आणि इंग्रजी भाषेतही नाही. आणखी एक विशेष म्हणजे मराठी माणूस फार अभिमानी आहे. राजस्थानच्या मेवाडी राण्यासारखा आहे. तो इंग्रज लोकांकडून काहीही शिकणार म्हणून नाही; तसे कुणी सांगायचा प्रयत्न करू लागला तर तो त्याला उडवून लावील. याच्या उलट उत्तरेकडचे लोक इंग्रजांचे अनुकरण करण्यात सदैव तयार, त्यांच्यासारखे कपडे, सूट-बूट वगैरेही लगेच उचलतील. पण मराठी माणसाला सूट घालायला लावणेही अशक्य; तो धोतरच नेसणार. टिळक-रानडे-गोखले यांच्यासारखे थोर पुरुषही सूटबूट न घालता नेहमी धोतर वापरीत; सरकारी नोकर असणाऱ्या थोड्या-फार जणांनी सुटाची सवय लावली. पण इथे सरकारी नोकरी करणे हेच मुळी हलक्या पातळीवरची नोकरी समजली जात असे. दोन-चारच त्यातले चांगले सरकारी नोकर अपवाद म्हणून सांगता येत होते. आमचे वडील नेहमी सांगायचे की नोकरी करण्यापेक्षा स्वतःचा व्यवसाय करणे चांगले आणि सरकारी नोकरी करणे तर महापापच. कारण त्यानंतर चारित्र्यहनन होण्याची धास्ती जास्त. मी तर पहात असे की कुणी आय्. ए. एस् झाला की त्याचा भाव लगेच तीस-पस्तीस लाखापर्यंत चढत असे. उत्तर भारतात तर हे जास्त जाणवते. तिथे आय्.ए.एस्. झाला की फार मोठा झाल्याचे मानले जायचे; पण इथे नाही; इथे शिकलेल्या, विद्वान व चारित्र्यसंपन्न माणसालाच मान.

पण आता दिल्ली, लखनौमध्ये सहजयोग पसरल्यावर हे सर्व बदलल्याचे पाहून मलाच आश्चर्य वाटते. जे लोक इंग्रजांची हांजी-हांजी करण्यात, त्यांचे अनुकरण करण्यात तत्पर होते तेच हे लोक का असे वाटावे अशी ही आश्चर्यकारक गोष्ट आहे. हे कसे झाले मलाच समजत नाही. पण श्रीराम, श्रीकृष्ण यांच्यासारखे अवतारी पुरुष इथल्या भूमीत वावरले म्हणून त्यांच्याच आशीर्वादाचे हे फळ असले पाहिजे. मला तर दुसरे काही कारण दिसत नाही. विशेषत: लखनौ सारख्या ठिकाणी जिथे खा-प्या-मजा करा हीच संस्कृति ते लोक कसे बदलले? मी महाराष्ट्रातून तिकडे गेल्यावर त्यांचे वागणे, घरातले वहिनी-नणंद कुणाशीही काहीही बोलण्याच्या पद्धती पाहून माझे डोकेच चालेनासे व्हायचे. मी पंजाबात शिकायला होते तेव्हाही पंजाब्यांची अशीच तऱ्हा पाहिली, त्यांच्या डोक्यात दुसरे काही शिरायचेच नाही. पण हे सर्व श्रीराम-श्रीकृष्णांचे आशीर्वाद त्यांना आता मिळाल्यामुळे घडून आले. त्यांची आता दिसून आलेले भक्ती, त्यांना मिळालेला आनंद हे आता मला दिसते आणि मलाही समाधान मिळते. तसे महाराष्ट्रातही मी खूप मेहनत केली. एकेक गाव, एकेक खेडे सगळीकडे जाऊन आले पण तिथे सहजयोग इतका चांगला जमला नाही. उत्तर भारतासारखा महाराष्ट्रात सहजयोग फारसा समजला नाही. उत्तर भारतासारखी स्थिती महाराष्ट्रात नाही. माझी सारी मेहनत बेकार गेल्यासारखे मला वाटे. मग विचार केल्यावर मला समजून आले की महाराष्ट्रात गुरूंचे स्तोम व प्रभाव फारच आहे. घरा-घरात गुरू, , सगळीकडे गुरूच-गुरू, त्यांच्या पंचांगातही गुरूंची नावे व जन्मतारीख दिलेली. त्यातले काही चांगले गुरू होते पण बाकीचे सारे पैसा व स्त्री यांच्यामागे लागलेले. महाराष्ट्राच्या या पवित्र भूमीमध्ये महाकाली, महासरस्वती, महालक्ष्मीची व आदिशक्तीचे स्थानें आहेत, अष्टविनायक व महाविनायक आहेत. हे लोक तसे अश्लील नाहीत पण धर्म समजण्याची क्षमता त्यांच्याकडे मुळीच नाही. मंदिरात जाणे, घंटा वाजवणे, गुरुच्या मागे लागणे वगैरे कर्मकाण्ड इथे फारच माजले आहे, तसे हे लोक वाईट नाहीत पण कर्मकाण्डात फार अडकले आहेत.

मी हे सर्व विश्लेषण हे समजावण्यासाठी केले की परदेशातील लोक ज्यांच्याबद्दल मला अजिबात आशा नव्हती ते लोक सहजयोगात गहन झाले; तसे उत्तर भारतातील लोकही– त्यांच्याबद्दलही मला मुळीच आशा नव्हती– तेही आले आणि हे सर्व लोक किती वरच्या स्थितीला पोचले हे कसे झाले? दिल्लीचीही हीच तऱ्हा– मी दिल्लीला बिल्ली म्हणत असे. माझे लग्नही इकडचेच– तीच गोष्ट पंजाब, उत्तर प्रदेश, राजस्थान या राज्यांची. महाराष्ट्र सोडून या सर्व प्रदेशांमध्ये सहजयोग खूप चांगला जमला आहे. हे महाराष्ट्राचे दुर्दैव आणि म्हणूनच तुम्ही सर्वांनी इथे येणे फार जरूरीचे आहे. कारण तुमच्या चैतन्यामधून इथे खूप मोठ्या प्रमाणावर जागृति होईल व लोकांचा कल इकडे वळेल. तुम्ही आलात की तुमचे चित्तही इथे लागेल व महाराष्ट्रात हे जे गुरू लोक ठाण मांडून बसले आहेत त्यांची उचलबांगडी होईल. हे काम तुमच्यामधील चैतन्यामधूनच होणार आहे. आजचा दिवस विशेष असा की ख्रिस्तांच्या परम-पवित्र जीवनाबद्दल आदर आज आपण व्यक्त करत आहोत. म्हणून मी मुद्दाम म्हणते की इथे जे गुरू सगळीकडे भरले आहेत– ख्रिस्त असते तर त्यांनी काठ्यांनी त्यांना झोडपले असते– त्यांची उचलबांगडी तुमच्याकडूनच होईल. आजपर्यंत त्यांचे चालले, त्यांनी पैसा खूप कमावला, पण हा मूर्खपणा इथे अजून आहे. सगळे चरण-धू महाराज आहेत. ही मूर्खपणा पत्करण्याची प्रवृत्ति या लोकांत कुठून आली समजत नाही. या परंपरेमुळेच महाराष्ट्राचे फार नुकसान झाले आहे. आणि म्हणूनच मी खात्रीपूर्वक सांगते की ख्रिस्तांचे जीवन, त्यांची अबोधिता व पावित्र्य या शस्त्राकडून व श्रीगणेशांच्या माध्यमातून या सर्व लोकांना नष्ट केले जाईल व महाराष्ट्रात जागृति घडून येईल आणि या महाराष्ट्रात लोकांना ते परमतत्त्व व परमधन प्राप्त होईल. इथे अनेक संतांनी कुण्डलिनीचे कार्य केले, या देशातच एकाहून एक शक्तीशाली संत होऊन गेले आणि त्या सर्वांनी जागृतीचे कार्य केले. म्हणून तुम्ही सर्वांनी इथे येणे फार जरूरीचे आहे; तुमच्या इथे येण्यानेच इथल्या लोकांच्या डोक्यात अक्कल येईल. **पुष्कळ लोक मला म्हणायचे की गणपतीपुळे प्रोग्राम आता दुसरीकडे करू पण मी ठामपणे नाही म्हटले आणि इथेच त्यांना येण्यास आग्रह केला. इथल्या लोकांमध्ये जागरण व ही भूमी पवित्र करणे हे तुमचे एक कर्तव्यच आहे म्हणून तुम्ही इथे येणे आवश्यक आहे. म्हणूनच या ठिकाणी आपण ख्रिस्तांचा गौरव करत आहोत;** तेच या सर्व गुरु-मंडळींना हंटर घेऊन ठोकणार आहेत; त्यांच्या पवित्र जीवनाचा गौरव करण्याचा व त्यांच्या शक्तीमधून इथे जागरण घडवून आणण्याचा तुमचा विचारच तुम्हाला इथे कार्य करायला शक्ती देईल. दरवर्षी तुम्ही ख्रिस्तांचा जन्मदिवस साजरा करण्यासाठी इथे येता ही फार महान गोष्ट आहे.

**तुम्हा सर्वांना अनंत आशिर्वाद.**

●●●

# पाश्चात्य सहजयोगी व सहज संगीत

गणपतीपुळे सहजयोग आंतरराष्ट्रीय शिबीरात झाल्या विविध कला-कार्यक्रमांमध्ये रशियन सहजयोगी श्री. विश्वनाथ आणि नागपूर संगीत अॅकॅडेमीमधील विद्यार्थी अशा २५ जणांनी सादर केलेल्या इंग्रजी-कव्वालीचा कार्यक्रम नावीन्यपूर्ण, नवनिर्मिती अशा दृष्टीने अतिशय उठावदार झाला. या कार्यक्रमाचे संगीत व दिग्दर्शन ही जबाबदारी विश्वनाथने सांभाळली. संकल्पना, मांडणी ही त्याच्या विद्यार्थ्यांनी केली. कव्वालीची मध्यवर्ती कल्पना श्री. आदिशक्तीचे अवतरण ही होती आणि त्याची समाप्ति आजचा सहजयोग व प. पू. श्री माताजींच्या संदेशाद्वारे केली गेली.

सुरुवात शिवनृत्यापासून झाली; नृत्य करता-करता श्री शिव थांबले आणि त्यांच्यामधून श्री. महाकाली, महासरस्वती आणि महालक्ष्मी या शक्ती प्रगट झाल्या. कालक्रमाने मानव उत्क्रांतीमार्गावर येण्याबरोबर त्याच्या विरोधात असणाऱ्या शक्ती अतिप्रभावी झाल्यामुळे उत्क्रांतीच्या अखेरच्या टप्प्यावर साक्षात् आदिशक्तीला अवतरण घेण्याची वेळ आली तेव्हा प. पू. श्री माताजींच्या स्वरूपात त्यांना या पृथ्वीतलावर जन्म घेतला. सहस्त्रार उघडणे हाच तो अखेरचा टप्पा होता आणि तोपर्यंत दहा गुरुंनी केलेल्या मार्गदर्शनाची परिणती म्हणून पृथ्वीतलावर श्री. माताजींनी सहजयोग सुरू केला आणि तो पसरत-पसरत आता बहार समयापर्यंत आला. मानवामध्ये संपूर्ण परिवर्तन घटित होऊन सर्व मानवजातीसाठी परमेश्वरी साम्राज्यात येण्याचा मार्ग उपलब्ध झाला. या कव्वालीची संक्षिप्त व्याप्ती ही थोडक्यात अशी आहे.

हे सर्व संगीतामधून (कव्वाली) प्रगट करणे हे एक आव्हानच होते पण श्री. विश्वनाथ व त्यांच्या सहकाऱ्यांनी हे आव्हान पेलले आणि आपल्या सामूहिक कलेद्वारा ते सादर केले. त्याचबरोबर ही सर्व संकल्पना उत्कृष्ट पेन्टिंग्जमधून चित्रमय करून, कव्वालीसोबत त्याची मांडणी करून एका अल्बममध्ये त्यांनी जुळवली व तो श्री. माताजींना नम्रपूर्वक अर्पण केला. त्यामधील एक पृष्ठावरील फोटोमध्ये दिसत आहे.

या सर्व कार्यक्रमामधून कलाकारांची सामूहिक कला व विचार शक्तीचे दर्शन झाले आहेच पण त्याचबरोबर भक्ती, शरणागति व ध्यान यामधून व कार्याचा ध्यास सतत बाळगून एक महान कलाकृती तकशी निर्माण होते याचीही प्रचीति येते.

● ● ●



# संगीत कार्यक्रमानंतर प. पू. श्री माताजींनी केलेला उपदेश

गणपतीपुळे २१ डिसें. ९८

आजचे हे संगीत इतके सुंदर असल्यामुळे तुम्हा सर्वांना त्याचा 'आत्मिक आनंद मिळालाच आहे. हा आनंद तुम्हीच आतमध्ये जाणू शकता आण त्याचा रस घेऊ शकता. तुमच्यापैकी अनेक जण हे भारतीय संगीत शिकला आहात आणि तुम्ही सर्वांनी त्याचा आनंद मिळवला. मी पाश्चात्य देशांमध्ये पाहिले की बरेच जण, लहान मुलेही पाश्चात्य संगीताकडे ओढले जातात, 'जाझ' वगैरे प्रकारात लोटले जातात. ही आत्माघातकी प्रवृत्ति त्यांच्यामध्ये कशी येते कळत नाही. त्यांच्या आई-वडिलांचाही थोडाफार दोष याच्यात असू शकेल. पण एकंदरीत पाहता त्यांच्या अंतरंगामध्ये काहीतरी अस्वस्थता असते आणि त्यांना जे पाहिजे ते मिळत नसल्याची हुरहूर हेच त्या अस्वस्थतेचे मूळ कारण असते. त्याचा परिणाम म्हणून जे काही चांगले आहे, मानले गेले आहे, मूल्याधिष्ठित आहे अशा गोष्टींपासून ते दूर होतात. म्हणून त्यांच्या मूलभूत कलागुणांना आविष्कार मिळेल अशा कशाच्यातरी त्यांना जरूर आहे. त्यांच्यामध्ये अनेक कलानैपुण्य असल्याचे मला आढळले. त्यांच्याबरोबर गप्पा मारतानाही मला ते जाणवत होते पण त्या कलागुणांना वाव मिळेल व ते बाहेर येतील अशी संधी त्यांना मिळत नव्हती. मग अशा काहीतरी विचित्र गोष्टी ते करू लागले की त्याचा त्यांनाच अर्थ कळत नव्हता. पाश्चात्य संस्कृतीमध्ये हीच गोष्ट अभावातून जाणवत होती. आणि त्यांच्या कलागुणांचा जो काही आविष्कार होत होता त्याचे कुणाला कौतुक नव्हते, त्या गुणांची कुणाला कदर नव्हती. म्हणून मला वाटू लागले की या मुलांमधील या कलागुणांना संधी दिली तर त्यांचे व्यक्तिमत्त्व सुधारून कुठल्याही आत्मघातकी गोष्टींकडे ते वळणार नाहीत. म्हणून मी प्रथम त्यांच्यासाठी एक शाळा सुरू केली आणि ही मुले त्या शाळेत दाखल झाल्यावर त्यांचा जीवनक्रमच बदलला. त्यांच्या जीवनात शिस्त व सुसूत्रता आली आणि इतरांपासून ती लगेच वेगळीच दिसू लागली. उदा. पाश्चात्य देशात एखाद्या मुलाला बाजारात घेऊन गेलात तर त्यांच्या मागण्यांना अंतच रहात नाही. इतक्या गोष्टी ते मागत राहतात; वाटेल त्या महागड्या वस्तू विकत घेणे परवडते का नाही हेही त्यांच्या लक्षात येत नाही, इतकी ती मुले बाजारात वेडी होतात. भारतातील मुले जरा वेगळी असतात. दुकानात त्यांना एखादी वस्तू घेऊन दिली की त्यांचे समाधान होते, आणखी काहीही मागत नाही. एकदा दिल्लीमध्ये मी माझ्या नातीला घेऊन बाजारात तिला चप्पल घेण्यासाठी गेले कारण तिच्याजवळ एकच जोड होता. पण एक नवी चप्पल घेतल्यावर मी आग्रह केला तरी ती आणखी चप्पल किंवा सँडल घेण्यास तयार होईचना; ही चप्पल तुटली तर त्यासाठी परत दिल्लीला येणे कठीण आहे असे सांगितले तरी ती तयार झाली नाही आणि मुकाट्याने बाहेर पडून कारमध्ये बसली. आता तिच्यासारखी मुले जन्मतःच आत्मसाक्षात्कारी असतात हे वेगळे पण भारतातील वातावरणच तसे कुण्डलिनीचे वेगळे आहे. म्हणून माझी खात्री आहे की इकडच्या शाळेतील मुले चांगली प्रगती करतील, आपले विचार व्यक्त करू शकतील आणि मोठी होऊन उत्तम व्यक्ती बनतील. त्यांच्यात इतकी शक्ती असेल असे मलाही वाटले नव्हते.

मग माझ्या मनात संगीत-ॲकॅडेमीची कल्पना आली आणि मी बाबाला (बाबामामा) त्याची कल्पना दिली आणि आम्हाला कल्पनाही नव्हती इतक्या लवकर, चार-पाच महिन्यातच या पाश्चात्य लोकांनी भारतीय संगीत आत्मसात केले. एरवी ही गोष्ट अशक्य आहे. भारतीयांना तर ते जमणेच शक्य नाही. आमच्या घराण्यात काही संगीत शिकणारे लोक मी पाहिले आहेत, ते भल्या पहाटे उठून तासन्‌तास रियाज करत बसत असत. मला तर गंमत वाटायची की पहाटे पाचनंतर त्यांच्या गाण्यामुळे कुणाला ओपच लागणार नाही. पण या पाश्चात्य लोकांत आपल्या आतमध्ये असलेल्या गुणांचा आविष्कार करून दाखवण्याची जबरदस्त इच्छा आहे. त्याबाबतीत भारतीय लोक कमी पडतात. जे इतरांना वर्षानुवर्षं जमणार नाही ते हे लोक तीन-चार महिन्यात आत्मसात करू शकतात हा चमत्कारच म्हणावा लागेल. त्याचप्रमाणे हे लोक मला कसे मानू लागले हेही मला समजत नाही. त्यामुळे आशा व आनंद सगळ्या वातावरणात भरून राहिला आहे. आता त्यातला एक इटालियन सहजयोगी बेल्जियममध्ये गेला होता. तिथे भारतीय दूतावास कार्यालयाने एक सहजयोगाचा कार्यक्रम ठेवला होता; तो मला सांगत होता की प्रोग्राममध्ये भारतीय सहजयोगी एकमेकांत गप्पा मारत होते, आत-बाहेर करत होते! ही त्यांची गहनता; भारतीय संगीताच्या चैतन्यमय प्रोग्राममध्येही पंधरा-वीस मिनिटात ते पेंगायला लागतात. काही ठिकाणी तर प्रोग्रामला आलेले भारतीय युवा सहजयोगीही पॉप वगैरे संगीत

प्रकारांबद्दल चोकस असतात. आणि पाश्चात्य कलाकारांची ते भारतीय संगीत शिकतात म्हणून टिंगल करू लागतात म्हणून त्यांच्याशी ते लोक बोलणेह बंद करतात. पण हीसुद्धा एक सहज-किमयाच असावी. असे मला वाटते कारण एरवी या लोकांना भारतीय संगीताची एवढी गहन आणि मुळातली जाणीव त्यांना समजली नसती. भारतीय संगीत तसे सूक्ष्म आहे आणि तुमच्या कुण्डलिनीकडूनच पोषण झाल्यामुळे तुम्ही ते पचवू शकता, समजू शकता आणि त्याचा आनंद घेऊ शकता. भारतीय संगीताचा हा प्रभाव भारतीय लोकांपेक्षा पाश्चात्य सहजयोगी कलाकारांवर जास्तच पडल्याचे दिसून येते. **मला हे बोलताना वाईट वाटते पण भारतीयांना तशी सखोल समज व आनंदाची जाणीव मुळातच कमी असते. उलट पाश्चात्यांना ते समजले नाही तरी त्याच्यातून ते आनंद नक्की मिळवू शकतात.** थोडेफार संगीत शिकलेल्या भारतीयांचा कल, गाणाऱ्याचे दोष दाखवण्याकडे, राग कोणता हे बघण्याकडे जास्त असतो. उलट पाश्चात्य लोक संगीत कलेच्या बाबतीत प्रथमतः नम्र असतात. आणि त्यांनी सूक्ष्मतेची खोली जाणली असल्यामुळे ते भारतीय संगीत लवकर आत्मसात करू शकतात. त्यांच्यामधील शक्ती अधिक सूक्ष्म स्तरावरून प्रवाहित झालेली असल्यामुळेच हे त्यांना शक्य होते.

भारतामध्ये या संगीताची पीछेहाट होत आहे आणि पाश्चात्य देशात ते अधिक समृद्ध होत आहे. सूर्य पश्चिमेकडे उगवण्यासारखी ही गोष्ट आहे. म्हणून माझी सर्व भारतीय सहजयोग्यांना विनंति आहे की भारतीय संगीतामधील गहनतेची जाण त्यांनी समजून घ्यायचा प्रयत्न करावा. मधमाशीसारखे तुम्ही बनलात तरच तुम्हाला मध शोषून घेता येईल, इतकी संवेदनशीलता तुमच्यामध्ये आणण्याचा प्रयत्न करा. हे ध्यान, कुण्डलिनीचे उत्थान, संतुलन यामधून सर्वव्यापी परमचैतन्याबरोबर योग झाल्यानंतरच होणे शक्य आहे. **विश्वनिर्मिती- च्या आधी सर्वत्र सारे काही शांत होते आणि सर्वात प्रथम ॐकार ध्वनि निर्माण झाला. या ध्वनीचे तुमच्यामधील सूक्ष्म स्वरूप तुम्ही जाणू शकला, त्याच्याशी एकरूप होऊ शकला तरच त्याचा आनंद मिळवू शकाल. तुमचा विश्वास बसणार नाही पण मी कधीही संगीत शिकले नाही, मला कुणाला गुरू करता आले नाही म्हणून असेल** पण आता मी सांगू शकते की माझ्यामध्ये संगीताचा आनंद घेणाऱ्या पेशी आहेत आणि म्हणून संगीत हे परमेश्वराकडून आले आहे असे मी म्हणते. तसे मी पाश्चात्य संगीतही आनंदाने ऐकते पण या भारतीय संगीताचे एक वैशिष्ट्य असे ते अक्षरलिखित नाही. कलाकार हा एकाचवेळी संगीताचे पुस्तक, त्याचा गीतकार आणि सादरकर्ता असतो. इथे ग्रुपमधून जे संगीत सादर केले तेही उत्तम होते; एका बाजूने संगीत आणि दुसऱ्या बाजूने सामूहिकता या दोन्ही गोष्टी मिळून चांगला परिणाम झाला. बाबामामांनी या अॅकेडेमीच्या कार्यामध्ये जो उत्साह व निष्ठा दाखवली त्याचा मला अभिमान आहे. त्यांनी फार प्रेमाने व आस्थेने ही अॅकेडमी चालवली आहे आणि आपल्या जुन्या गुरू-शिष्य परंपरेनुसार तिथे संगीत शिकवले जात आहे. तुम्ही सर्वजण खूप कष्ट घेत आहात. बाबामामाही खूप कष्ट करत आहेत आणि या अॅकेडमीमधूनच मी वर सांगितल्याप्रमाणे संगीताचे सूक्ष्मातले कार्य जगभर पोचणार आहे.

आता रात्रही खूप झाली आहे आणि उशीर झाला आहे. पण मला आणि तुम्हालाही याची सवय झाली आहे. आमच्या घरीही माझ्या लहानपणी त्यांना संगीतामध्ये रस असल्यामुळे अशा सभा चालत असत तेव्हा आम्ही पहाटे पाच वाजल्यानंतर झोपायला जायचो. तुम्ही सर्वजणही त्या आनंदाचा अनुभव घेत आहात. हे पाहून मलाही आनंद होत आहे. **आता मला खूप आशा व खात्री आहे की जगभरातील दुःखी, निराश, असमाधानी, आत्महत्येकडे प्रवृत्त झालेले लोकांना, विशेषतः पाश्चात्य लोकांना आपण सहजसंगीताचे अमृत पोचवू शकू.** इकडचे लोक राजकारणी पुढारी बनण्याच्या मागे लागले आहेत, ही पण एक घातक वृत्ती आहे, गुन्हेगारी प्रवृत्ति पण वाढत आहे, विध्वंसक कृत्ये वाढली आहेत, या सर्वांवर सहजयोग हाच एकमेव उपाय आहे. ज्यातून त्यांना अध्यात्मिक आनंदाचा सागर भेटणार आहे आणि **सहजयोग्यांनी जर हे कार्य केले तर सर्व मानवजातीचे कल्याण होणार आहे. मला हे घटित होईल याची आता खात्री आहे.**

मी बाबामामांचे आणि अॅकेडमीतील सर्व कलाकारांचे आभार मानते आणि त्यांना संगीतामधील सूक्ष्मतेची अधिकाधिक जाणीव होईल अशी आशा करते. एरवी आपण चर्चा, वादविवाद, मतप्रदर्शन यामधून सारखी प्रतिक्रियाच व्यक्त करत असतो, संगीत आतपर्यंत उतरण्यासाठी त्याचा काही उपयोग नाही. **संगीतामधून आनंद मिळवला पाहिजे, आनंद असला की दुसरे काही नसते, असा निर्मळ आनंद तुम्ही मिळवला पाहिजे**, आजचे सर्व कार्यक्रम सुंदरच झाले. औरंगाबादमध्ये इतक्या सुंदर डान्स करणाऱ्या मुली असतील असे कोणालाच वाटले नसेल. औरंगाबाद म्हणले की औरंगजेब डोळ्यासमोर येतो; तो फार दुष्ट होता. अनेक हिंदूंची त्याने कत्तल केली, त्याला मशीदी बनवायचा नाद होता. त्याच्यावरूनच औरंगाबाद हे नाव पडले असावे, खरे तर ते बदलायला हवे. त्याला संगीताचे काहीही ज्ञान नव्हते. पण तो फार प्रामाणिक होता,

कुणाकडूनही राज्यासाठीही पैसे घेत नसे. त्याचा क्रूरपणा सोडला आणि त्याच्यामध्ये थोडासा प्रेमळपणा असता तर चांगला ठरला असता. त्याच औरंगाबादकडून हे चांगले संगीत ऐकायला व पहायला मिळाले याचेच मला नवल वाटते. औरंगजेब ज्या संगीताचा तिरस्कार करायचा तीच उत्कृष्ठ कला व नृत्य या लोकांना कसे जमले? तसेच कुचिपुडी नृत्यही छान होते पण ते एक पाश्चात्य कलाकार इतक्या थोड्या कालावधीमध्ये शिकला हेही आश्चर्यकारकच. तसा हा नृत्यप्रकार फार अवघड आहे. हे सर्व पाहून मला समजेनासेच होते. **लोक म्हणतात की हा सहजचाच चमत्कार आहे. पण सहजही तुम्ही तुमच्यामध्ये मुरवायला हवा, तेव्हाच तुम्हाला शक्तीच्या या सागराची कल्पना येईल.**

माझे तुमच्या सर्वांवर फार प्रेम आहे; पण प्रेम आहे म्हणून मी हे बोलत नाही तर मी सांगते ते सत्य आहे, वास्तव आहे. मला आधी कल्पना नव्हती पण **आता माझी खात्री आहे की जगभर पसरलेल्या सहजयोगामधून मानव-कल्याणाचे कार्य घडून येणार आहे. त्यासाठी तुम्ही सतत चैतन्याबरोबर रहा.** तुमच्यामध्ये वाद्य-वादन करणारे, तबला-वादन करणारेही चांगले कलाकार मला दिसले. तबला ही तर फार अवघड कला आहे, वर्षानुवर्षे नुसता त्रिताल शिकायला मेहनत करावी लागते. बाबामामांना विचारले तर प्रत्येक कलाकार चार-पाच महिन्यापासूनच शिकत असल्याचे समजले! मला तर वाटू लागले आहे की संगीतासाठी पाश्चात्य लोकच चांगले आहेत. हा सारा चमत्कारच आहे; पण तो पाश्चात्य देशात घडून येतो, पौर्वात्य देशात तसे होत नाही याचे कारण मला समजत नाही, तसे इथले भारतीय लोकही या संगीताचा आनंद घेत आहेत, कारण ते सहजयोगी आहेत. पण हे लोक जेव्हा प्रोग्रामला जातात तेव्हा त्यांना किती आदराने वागवतात हे पहा; **भारतामध्ये कलाकारांना मिळणारा सन्मान अजून उच्च स्तराचा असायला हवा. तसे कुठल्याही कलाकाराचा, चित्रकार असो, हस्तकौशल्य बनवणारा असो, त्याचा आदर केलाच पाहिजे कारण त्याची कला ही परमेश्वराकडून मिळालेली देणगी असते.** आता भारतातही एक बदल घडत आहे आणि तो म्हणजे अनेक नामवंत कलाकार पाश्चात्यांच्या प्रभावाखाली येत आहेत; अनेकांना व्यसने जडली आहेत. हे थांबले नाही तर त्यांची कला संपुष्टात येईल. अशा व्यसनी लोकांना चांगले क्रिकेटही जमणार नाही मग संगीताची गोष्टच सोडा. विशेषतः दारू पिण्यामुळे आपल्याकडचे गायक कलाकार संपुष्टात येतील याची मला धास्ती आहे. पण आता या पाश्चात्यांची कला (संगीत) ऐकल्यावर त्यांच्या डोक्यात प्रकाश पडेल अशी मला मोठी आशा आहे. मला तर वाटते की अशा व्यासपीठावर भारतीय कलाकारांच्या ऐवजी पाश्चात्य कलाकारांनाच आणावे. त्याचा फार मोठ्या प्रमाणावर परिणाम होईल. भारतीयांना संगीतसभेत कसे वागावे हे कमीच समजते. संगीतसभेला येणे हे एखाद्या सामाजिक कार्यक्रमाला येणे असेच ते समजतात. म्हणून भारतीय सहजयोग्यांनी आत्मपरीक्षण करून आपण कुठे आहोत हे लक्षात घ्यायला हवे, ही त्यांचीच जबाबदारी आहे. कुणीतरी मला म्हणालेही की माताजी आम्ही भारतीयांबरोबर संगीत-कार्यक्रमाला गेलो तर आमचे कसे होणार?

आपल्याकडेही तसे उत्कृष्ट गायक आहेत. अरुण आपटे तुम्हाला माहीत आहेतच. पुण्याजवळ शेरे या ठिकाणी आमचा एकदा प्रोग्राम होता. प्रोग्राम चालला असताना मला खूप थकल्यासारखे वाटल्यामुळे परत यावेसे वाटत होते. मी आता कुणाचा कार्यक्रम आहे असे विचारले तर योगीजींनी कुणीतरी असाच एक गायक गाणार असल्याचे सांगितले, त्याचे नावही त्याला सांगता येईना, कदाचित् त्या वेळेस योगीजींनाही संगीतामध्ये तितकासा रस नव्हता, म्हणून त्यांनी मला खोलीवर जाऊन विश्रांति घेण्यास सांगितले. पण अंथरूणावर पडल्यावर मला त्या गायकाचा आवाज ऐकू आला आणि अचंबा वाटला आणि मी त्याची चौकशी केली; इतकेच नव्हे तर मी साडी बदलून पुन्हा मंडपामध्ये परत आले. मग मला त्या गायकाचे नाव कळले आणि मी लगेच त्यांना बजावले की हा कलाकार साधासुधा नसून फार महान कलाकार आहे. त्याला पैसे किती देणार होते ते ऐकल्यावर मी योगींनीना वेडे आहात का असेच सरळसरळ म्हणाले. मग मी अरूणचे संगीत ऐकले, त्याच्या गुरूनाही मी ओळखत होते व त्यांचेही संगीत मी ऐकलेले होते. अजित कडकडे हा अरूणचा गुरूबंधू. पण मला आश्चर्य हे वाटले की कुणाही भारतीय सहजयोग्याला अरूणाच्या संगीत-कलेची महती कळली नव्हती. महाराष्ट्रीयांना शास्त्रीय संगीत एकंदरीत कमीच समजते. पण आता तसे नाही. शास्त्रीय संगीताचे हे पुनरूज्जीवन झाल्याचे मला फार समाधान आहे. माझी हीच इच्छा होती की चित्रकला, हस्तकौशल्य, संगीत यासारखे कलागुण समृद्धीला आले पाहिजेत.

इतका उशीर होऊनही तुम्ही सर्वजण ताजे-तवाने आहात व संगीताचा आनंद लुटत आहात हे पाहून मला फार समाधान होत आहे.

**तुम्हा सर्वांना अनंत आशिर्वाद**

# प्रोटोकॉल्स

श्री. अरूण गोएल यांनी गणपतीपुळे शिबिरात सहजयोग्यांना केलेल्या सूचना : डिसें. ९८

वीस वर्षांपूर्वी गणपतीपुळे सेमिनार मालगुंडला होत असे. त्यावेळेस साधारण २००-२५० पाश्चात्य सहजयोगी आणि अंदाजे ५० भारतीय सहजयोगी असायचे. आता जवळ-जवळ ७००० सहजयोगी इथे जमतात. या सगळ्यांची व्यवस्था करण्यासाठी दोनशेच्या वर सहजयोगी मुंबई आणि जवळपासच्या गावातून इथे महिनाभर आधी येऊन राहतात आणि अपार कष्ट करून आपल्या सर्वांसाठी तयारी करून ठेवतात. आपल्यामध्ये बरेच नवीन सहजयोगी असल्यामुळे श्री. माताजींनी प्रोटोकॉल्स पुन्हा एकदा सर्वांना समजावून सांगण्याची सूचना केली आहे; म्हणजे नकळत होणाऱ्या चुकाही पुन्हा होणार नाहीत.

घरी ध्यान करण्यासाठी श्रीमाताजींचा फोटो ठेवतो ती व्यवस्था अगदी साधी असली पाहिजे. उगीच पंधरा-वीस फोटो ठेवण्याची जरूरी नाही व जुने झालेले, काळवंडलेले फोटो वा फ्रेम असू नयेत. एक चरणांचा व एक श्रीमाताजींचा असे दोनच चांगले फोटो असले पाहिजेत; त्याशिवाय वाटल्यास दोन-तीन इतर फोटो ठेवावेत पण याहून जास्त नकोत. त्यामुळे आपले चित्त एकाग्र होणे सोपे जाते. फोटो खालील वस्त्र स्वच्छ व छान असावे.

ध्यान करताना वातावरण ध्यानास पोषक असावे. फोटोजवळ दिवा व उदबत्तीचे स्वच्छ स्टँड असावे. कुंकू-कापूर इ. साधने दिसणार नाहीत अशी ठेवावी. (ड्रॉवरमध्ये किंवा झाकून) फोटोची जागा थोडी उंचावर असावी, पायापाशी असू नये.

श्रीमाताजी आदिशक्ति आहेत ही सहजयोग्यांची श्रद्धा असल्यामुळे त्यांचा आदर ठेवणे आपले कर्तव्य आहे.

आपल्या व्यवसायाच्या व नोकरीच्या जागी श्रीमाताजींचा फोटो अवश्य असावा. त्याबद्दल संकोच बाळगू नये. असा फोटो कुणाच्याही नजरेस येईल अशा जागी लावावा. म्हणजे कुणी-ना-कुणी त्याबद्दल विचारेल आणि त्याला सहजयोग सांगण्याची संधी तुम्हाला मिळेल. प्रत्येक सहजयोग्याने कमीत कमी एक हजार लोकांना जागृति दिली पाहिजे असे नुकतेच श्रीमाताजींनी सांगितले आहे आणि हेही एका वर्षभरात केले पाहिजे. अशातूनच सहजयोगी श्रीमाताजींना अपेक्षित असलेल्या उन्नत स्थितीवर येऊ शकतील. श्रीमाताजींच्या प्रत्यक्ष उपस्थितीत त्यांच्यासमोर सहजयोग्यांनी कसे राहिले पाहिजे हाही एक प्रोटोकॉल्सचा फार महत्त्वाचा भाग आहे. याबाबतीत सामूहिकतेत बऱ्याच कमतरता आढळून येतात. श्रीमाताजी साक्षात् आदिशक्ति असल्यामुळे त्यांना कसलीही इच्छा नसते, कसली गरज नसते; त्या जे काही करतात व सांगतात ते आपल्या उन्नतीसाठी असते. संगीत कार्यक्रमातूनही त्यांचे लक्ष आपल्या कुण्डलिनीकडे असते. संगीतामधून आपण त्यांच्या सहस्त्रारापर्यंत व हृदयापर्यंत पोचतो. म्हणून संगीत किंवा इतर कार्यक्रमामध्ये आपण एकमेकांशी बोलण्यात, डुलकी घेण्यात किंवा चहावगैरेसाठी उठून बाहेर जाण्यात विचलित होतो तेव्हा आपला त्यांच्याबरोबरचा संपर्क तुटतो, त्यांच्या करूणामय आशीर्वादांना आपण मुकतो म्हणून श्रीमाताजींकडे आपले चित्त पूर्णपणे एकाग्र ठेवले पाहिजे, त्यामुळे त्यांच्या व्हायब्रेशन्स आपण सामावून घेऊ शकतो.

श्रीमाताजींच्या उपस्थितीत कुणीही कुण्डलिनी चढवू नये वा बंधने होऊ नये; तसेच दुसऱ्या व्यक्तींवर कार्य करू नये. कारण श्रीमाताजींचे चित्त आपल्या सर्वांवर कार्य करत असते. म्हणूनच तर आपल्या सामूहिकतेमध्ये त्या आलेल्या असतात. तसेच श्रीमाताजी आल्यावर सहजयोग्यांनी हात वर उंच करू

नये.

श्रीमाताजींच्या उपस्थितीत सहजयोग्यांनी चित्त, हृदय व सहस्त्रार या सर्वांमधून त्यांचेकडेच लक्ष ठेवावे. हृदय व सहस्त्रार एकाकार झाल्यावरच उन्नती मिळते व निर्विचारता येते. जेव्हा काही कार्यक्रम नसतात तेव्हा वाटल्यास विश्रांति घ्यावी म्हणजे कार्यक्रमाचे वेळी आपण ताजेतवाने असतो.

श्रीमाताजींसमोर पाठ करून कुणीही उभे राहू नये वा बसू नये. त्या आपल्या गुरू आहेत. म्हणून त्यांच्यासमोर पाय पसरून बसू नये. त्याचप्रमाणे त्यांच्यासमोर गायन-वादन सादर करताना कलाकारांनी पायांवर शाल पसरून बसावे म्हणजे पाय झाकलेले राहतील.

श्रीमाताजी कार्यक्रमास आल्यावर जयजयकार करण्याची पद्धत चुकीची आढळून येते. ओरडून मोठ्या आवाजात जयजयकार करू नये तसेच जयजयकारही फक्त एकदाच करावा कारण त्याचा उद्देश फक्त श्रीमाताजींचे आगमन जाहीर करण्याचा व त्यामधून आपला आदर दाखवण्यांचा असतो. पुन्हा-पुन्हा जयजयकार करू नये.

पूजेच्या वेळी होणारे संगीत वा भजने श्रीमाताजींना अर्पण केली जात असल्यामुळे टाळ्या वाजवू नयेत. तसेच पूजेच्या वेळी कधीही डोळे मिटून घेऊ नये. श्रीमाताजींचे दर्शन हे आदिशक्तीचे दर्शन आहे म्हणून डोळे सतत उघडे ठेवावे. मागे, इकडे-तिकडे कोण आला-गेला इकडे दृष्टी फिरवू नये व श्रीमाताजींकडेच पहात रहावे. तसेच आपल्यामुळे शेजाऱ्यांच्या ध्यानात व्यत्यय येणार नाही याची खबरदारी घ्यावी. तसेच श्रीमाताजींच्या उपस्थितीत आपण स्वतःच्या कुण्डलिनीकडे लक्ष देऊ नये, श्रीमाताजींचे तिकडेच लक्ष असते.

कार्यक्रमाचा मंडप हे येथील मंदिर आहे म्हणून मंडपात पादत्राणे घालून येऊ नये, तसेच मंडपात कार्यक्रम नसतानाही कोणी झोपू नये किंवा गप्पा मारत बसू नये. कार्यक्रम नसताना ध्यान करण्यासाठी किंवा दुसऱ्यावर कार्य करण्यासाठीच मंडपामध्ये असावे. मंडप स्वच्छ राहील याची काळजी घ्यावी. तसेच जेवणाचे वेळी अन्न फुकट टाकून अन्नपूर्णेचा अपमान होणार नाही याची काळजी घ्यावी व प्लेटमध्ये खाल्ले जाईल यांच बेताने वाढून घ्यावे.

दुपारी बारा ते चार व संध्याकाळी सूर्यास्तानंतर समुद्रावर कुणीही जाऊ नये. पाण्याची ट्रीटमेंट वगैरे सकाळी शक्य तो लवकर समुद्रावर येऊन करावी. विशेष करून सकाळचे ध्यान झाल्यावर समुद्रावर जावे. समुद्र हा आपल्या आजोबांसारखा आहे म्हणून त्याला हातावरून पाणी सोडून आदराने नमस्कार करावा. सहजयोगी व योगिनी यांनी दूर-दूर राहून ट्रीटमेंट करावी. तसेच बाहेरच्या दुकानातून उगीच खरेदी करण्यात वेळ वाया घालवू नये.

काही सहजयोगी गणपती-पुळे मंदिरात जातात, प्रदक्षिणा करतात व तिलक वगैरे लावतात. पण हे सर्व साक्षीभावातून होत असेल तर ठीक आहे; खरे तर हे स्वयंभू स्थान आहे; तसे श्री माताजींनीच सर्व स्वयंभू निर्माण केलेले असल्यामुळे श्रीमाताजींच्या पूजेशिवाय दुसरी कसली पूजा करण्याची जरूरी वाटू नये. शिवाय आपल्या अध्यात्मिक प्रगतीसाठी आपल्याला अनन्य भक्तीमध्येच उतरले पाहिजे. परमात्मा, सर्व देव-देवता व स्वयंभू देवतांचे रूप आपल्याला श्रीमाताजींमध्येच जाणवले पाहिजे. तसेच इतर मंदिरातील प्रसाद खाणे वा तिलक लावणे योग्य नाही. त्यामुळे नाभीचक्रावर त्रास होण्याची संभावना असते.

●●●

# पाश्चात्य सहजयोगी व सहजसंगीत

गणपतीपुळे सहजयोग शिबिरामध्ये २६ डिसेंबर '९८ ला श्री अरूण आपटे यांचा प. पू. श्री माताजींच्या उपस्थितीत सहज-संगीताचा कार्यक्रम झाला. मध्यरात्र उलटून दोन प्रहर झाला असूनही सर्व सहजयोगी या कार्यक्रमाची उत्सुकतेने वाट पहात होते.

यावेळेच्या कार्यक्रमाला अरूण बरोबर त्यांचे नागपूर ॲकॅडेमीतील दहा-बारा विद्यार्थी होते व ते सर्व पाश्चात्य देशातील सहजयोगी होते. कार्यक्रमाचे संचालनही त्यांतील एका सहजयोगिनीने केले. परभाषीय असूनही त्या लोकांनी भारतीय संगीत थोड्या कालावधीतच आत्मसात केले आहे हे कार्यक्रमामधून दिसून आले. एक प्रकारे हा सामूहिक शास्त्रीय संगीतामधून चैतन्य प्रवाहित करण्याचाच मार्ग आहे. त्यासाठी अशा सर्व कलाकारांना आपल्या अटेन्शनबद्दल जागरूक रहावे लागते व एकमेकांच्या अटेन्शनमध्ये विसंगती येणार नाही याची काळजी घ्यावी लागते. त्याचप्रमाणे संगीत व चित्त यांची एकात्मता जपावी लागते. त्या दृष्टीने हा कार्यक्रम यशस्वी झाला. व त्यातून श्रीमाताजींचे चैतन्य सर्व सहजयोग्यांपर्यंत सहज पोचू शकले.

श्री. अरूण बरोबर साथ करताना या सहकाऱ्यांनी भजनाचे पुरवडे व आलाप अगदी सुरेल व लयबद्ध पद्धतीने म्हटले व ते म्हणताना कुठेही चुका जाणवल्या नाहीत. यावरून त्यांनी शास्त्रीय संगीत शिकतांना मेहनत घेतल्याचे जाणवले. ॲकॅडेमीमध्ये भारतीय संगीत शिकत असतानाच सामूहिक ध्यान, श्री. माताजींच्या कॅसेट्स ऐकणे व सहजयोगाची सखोल माहिती घेणे या बाबतीतही विद्यार्थ्यांकडे तितकेच लक्ष पुरवले जाते. त्यातून या पाश्चात्य कलाकारांची "संगीत व सहजयोग" याबद्दलची जाण अधिक प्रगल्भ करण्याचा उद्देश असतो आणि असे कलाकार आपापल्या देशात परत गेल्यावर संगीतामधून सहजयोग अधिक जोमाने त्या त्या स्थानिक भाषेमधून सांगण्याची क्षमता ते मिळवू शकतात.

या कार्यक्रमामध्ये शाम-कल्याण (मूलाधार चक्र) पासून सुरुवात करून प्रत्येक चक्रासाठी भजन/मंत्र म्हणण्यात आले व समाप्ति भैरवीने करण्यात आली. सर्व सहजयोगी चैतन्यात न्हाऊन निघाले व संगीताचा लाभ आपल्या चक्रांसाठी घेऊ शकले. कार्यक्रम संपेपर्यंत पहाट होत असल्याचेही कुणाच्या लक्षात आले नाही.

कार्यक्रमानंतर प. पू. श्री माताजींनी श्री. आपटे व त्यांच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांना त्यांच्या कार्यासाठी भरभरून आशीर्वाद दिले.

●●●



# प. पू. श्री माताजींचे पुजा प्रसंगी प्रवचन

कळवा : ३१ डिसें. ९८

आज मी भारतीय संस्कृतीबद्दल बोलावे अशी इच्छा प्रदर्शित केली गेली. पण आज या मुंबईमध्येच ही संस्कृती दिसेनाशी झाली आहे असे म्हटले जाते; पण मला ते मान्य नाही. कारण या संस्कृतीची पाळेमुळे इतक्या खोलवर पोचली आहेत की ती अशी नाहीशी होणार नाही. बाहेरून या देशात आलेल्या लोकांनाही आता हे समजले आहे की या देशाला लौकिक अर्थाने असा कोणता धर्म नाही; इथे इतर देशांसारखी धर्मासाठी अशी संस्थाप्रणाली नाही. पाद्री वगैरे सारखे धर्मगुरू नियुक्त केले जात नाही. तरीही इथे धार्मिकता आपोआप व सहजपणे रुजली आहे. पण त्याच्या पाठीमागे मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे इथे पूर्वीपासुन अनेक थोर साधु-पुरुष होऊन गेले आणि त्यांना संत ही पदवी मिळाली. म्हणून त्यांना कुणी चॅलेन्ज केले नाही आणि सर्व समाजाने त्यांचे सांगणे मान्य केले. कालान्तराने इथे जाति-व्यवस्था आली. पूर्वी असा जातिभेद नव्हता. वाल्मिकी कोळ्याने श्रीरामांबद्दल लिहिले, श्रीकृष्णांबद्दल लिहिले गेले आणि आपण त्याला ब्राह्मणाने त्या कथा लिहिल्या आहेत का असा विचार न करता, मान्यता दिली. ब्राह्मण या शब्दाचा खरा अर्थ म्हणजे ज्याने ब्रह्म जाणले आहे तो, ज्याने ही सर्वव्यापी परमेश्वराची प्रेमशक्ती जाणली आहे तो. पण नंतरच्या काळात जाति-व्यवस्थेला जन्मवंशाचे परिमाण आले आणि जन्मावरून जात ठरवली जाऊ लागली. आणि त्यानुरूप व्यावसायिक जाती सुरू झाल्या आणि भारतामध्ये जाति-व्यवस्था व्यवसायावर आधारीत झाली. पुढे-पुढे विवाह-संबंधही एका जातीमध्येच होत राहिले आणि या जाति-व्यवस्थेला कायम स्वरूप आले. इंग्रज अंमल सुरू झाल्यावर त्या लोकांनी धूर्तपणे याचा फायदा घेतला आणि समाजामध्ये जाती-जातींबद्दल दुरावा निर्माण केला. खरे तर चोखामेळासारखे संत अनुसूचित जातीतलेच होते. पण नामदेव, एकनाथ वगैरे संतांनी सर्व जातीच्या लोकांना भेदभाव न करता भक्तीमार्गामध्ये एकत्र आणले आणि सगळ्या जातीच्या लोकांना आत्मसाक्षात्कार मिळवण्यातच जीवनाचे सार्थक आहे ही शिकवण दिली. संता-संतांमध्ये जातीनुसार काहीच फरक केला गेला नाही. त्यांना कुठल्या एका धर्माचे–हिंदू, मुस्लिम, जैन इ.– म्हणून त्यांच्यात फरक केला गेला नाही आणि सर्वांना संत म्हणून मानले गेले. त्या सर्वांनी नितिधर्मानुसार व उच्च स्तराच्या अध्यात्मिक पातळीवरील जीवनाची शिकवण दिली.

सहजयोगी म्हणून तुमच्यातही आता पूर्वीचा धर्म, जात इ. बद्दलचा विसर पडला आहे, ते भेदभाव गळून गेले आहेत आणि योगी बनल्यावर नीतीमत्ता हाच तुमच्या जीवनाचा आधार-स्तंभ झाला आहे. या देशात नीति हा शब्द राजकारणापासून सर्व क्षेत्रांमध्ये तोडाफोडी करण्याच्या उद्देशाने वापरला गेला. या प्रवृत्ती पूर्वीच्या काळी फारच दृढ झाल्या होत्या. इतक्या की नवीन माणूस भेटला की प्रथम त्याची जात विचारली जायची. पण आता तसे होत नाही. तरीसुद्धा राजकारणात जाती-जातींचा भेदभाव मते मिळवण्यासाठी अजूनही करतात. लोकशाहीमुळे लोकांचा विशेष काही फायदा झाला असेल असे मला वाटत नाही. कुणीही उठून कसलीतरी संस्था काढतो. आपली घटना बनवली गेली तेव्हा आंबेडकरांनी अनुसूचित जाती-जमातींना विशेष हक्क देण्याचा आग्रह धरला पण माझ्या वडिलांनी त्याला विरोध केला. त्यांच्या म्हणण्यानुसार "आहे व नसलेले" (Haves and have nots) या दोनच जाती धरल्या पाहिजेत; म्हणजे ज्यांना न्यूनतम जीवनावश्यक गोष्टी मिळत नाहीत त्यांच्या गरजांकडे लक्ष देता येईल. आता मंडल आयोगातून फारच गंभीर परिस्थिती निर्माण झालेली तुम्हाला माहीत आहे. त्या रिपोर्टमुळे बऱ्याच जटिल समस्या निर्माण झाल्या. तो जर संयमी आणि नीतीतत्वाला मानणारा असला तर हे घडले नसते. अशा कृत्रिम जाती निर्माण केल्या गेल्यामुळे या देशाचे फार नुकसान होत आहे. त्याचबरोबर गुरूंच्या, साधुसंतांच्या जातीबद्दल चुकीच्या कल्पना पसरत आहेत; आपल्या देशातही अनेक लोक गुरू बनू लागले आहेत.

आपल्या संस्कृतीचा अध्यात्म व नीति हाच मुख्य धागा आहे. त्याशिवाय मानवप्राणी जनावरापेक्षाही वाईट होतो. नीतीमत्तेची प्रत्येकाला फार जरूरी आहे. आमच्या तरूणपणीसुद्धा नीतीमत्ता फार जपली जायची. पण आजकाल सगळाच विचित्र प्रकार झाला आहे, तो एक प्रॉब्लेमच बनला आहे आणि जोपर्यंत सहजयोगाचा जोमाने प्रसार होत नाही तोपर्यंत या देशातील परिस्थिती सुधारेल असे मला वाटत नाही. त्यातील मुख्य तत्त्व हेच आहे की एकदा नितीमत्तेकडे तुमचे चित्त लागले की प्रत्येक गोष्टींमधील मूलभूत तत्त्वे तुमच्या लक्षात येतात; तुम्ही अगदी वेगळ्या प्रकाराद्वारे कार्य करू लागता. नुसत्या भौतिक फायद्याचाच विचार केला तर तुम्ही अमेरिकन माणसासारखे व्हाल; तसेच कुठल्याही हलक्या गोष्टींकडे वळलात तरी तेच

होणार. भारतीय संस्कृतीचा मूळ आधार नीतिमत्ता व अध्यात्म हाच आहे; इथे अनीतिमान व्यक्ती अगदी हीन जातीची समजली जाते; त्याला विवाहासाठी अयोग्य समजतात व समाजात त्याला काही किंमत नसते. एवढेच काय कुटुंबामध्येही त्याचा स्वीकार होत नाही. अशी माणसे समाजस्वास्थ्याला घातक असल्यामुळे त्यांना समाजापासून दूर ठेवले जाते. मद्यपान करणेही निषिद्ध मानले जाते. मद्यपानाची सुरुवात Cheers असे करून का करतात समजत नाही. जेवणाला बसताना मद्यपान करणे आपल्याकडे चालत नाही. भारतात असे सुसंस्कृत लोक करत असतील असे मला वाटत नाही. ती अगदी विकृत पद्धत आहे. मुलाबाळांसमोर जेवणाच्या टेबलावरही राजरोसपणे मद्य पिणे आणि वर Cheers म्हणणे हा वेडेपणा आहे. पाश्चात्य लोकांत तर घरी कुणी मयत असला काय किंवा कुठे मूल जन्माला आले काय, दोन्ही प्रसंगी मदिरा पितात. भारतातील अगदी हलक्या कुळातही असले प्रकार होत नाहीत. आता आजकाल भारतामध्येही मोठ्या शहरात मद्यपान सर्रास केले जाते म्हणा; पण भारतीय तत्त्वप्रणालीच अशी आहे की व्यक्तीचे स्वातंत्र्य मानल्यामुळे त्याला काहीही करण्याची मोकळीक आहे. पण त्याला धर्माचे किंवा परमेश्वराचे नाव देऊन ते प्रकार चालत नाहीत; लोक ते चालूच देणार नाहीत. गणपतीपुतळ्यातही चोरी चोरी पद्धतीने बिअर विकली जात असल्याचे माझ्या कानावर आले पण कायद्याने तो गुन्हा मानला आहे. विशेषतः मंदीर, चर्च अशा ठिकाणाचे पावित्र्य राखलेच पाहिजे.

शुद्ध आचरणाला म्हणूनच फार महत्त्व आहे. इथे कुणा एका सधन माणसाचे लग्न ठरले होते पण नंतर त्या मुलाचे कुणा मुलीबरोबर संबंध असल्याचे कळल्यामुळे मुलीच्या भावाने त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला, आता त्या मुलाचे लग्न होणे या गावामध्ये अशक्य आहे. म्हणजे शुद्ध आचरणाबद्दल समाजच जागरूक असतो. विशेषतः सहजयोगात आल्यावर तुम्ही धर्माविरूद्ध आचरण करू शकत नाही; तसे करायचा प्रयत्न केलात तर सहजयोगातून बाहेर फेकले जाल. ही अगदी साधी व स्वच्छ गोष्ट आहे. एकवेळ मी क्षमा करेन पण सहजयोग क्षमा करणार नाही. कारण मग इतर सहजयोग्यांवरही त्याचा विपरीत परिणाम होईल. म्हणून शुद्धतेला सहजयोगात फार फार महत्त्व आहे. पण मला आश्चर्य वाटते म्हणजे हे पाश्चात्य लोक सहजयोगात आल्यावर सहज-धर्माचे परिपूर्ण आचरण करतात. त्याबाबतीत काटेकोरपणे वागतात. कारण यातच त्यांचे कल्याण आहे हे त्यांनी ठामपणे जाणले आहे; त्यातूनच आपली वाढ होणार आहे म्हणून नीतिमत्ता हे आपल्या जीवनाचे महत्त्वाचे अंग आहे याची त्यांना खात्री पटली आहे. अनीतीच्या गोष्टी त्यांचे वडील, कुटुंबीय व मित्र वगैरे करत असलेले ते पाहतात पण त्यांच्याकडे ते ढुंकूनही पहात नाहीत. ही फार अभिमानाची गोष्ट आहे. आपल्या लोकांची गोष्ट वेगळी आहे कारण आपली संस्कृति व वातावरणच शुद्ध आचरणाचा आदर करणारे आहे. स्त्रीकडे नुसते बघणेही आपल्याकडे चुकीचे समजले जायचे. आता काही श्रीमंत व पाश्चात्य संस्कारात वाढलेले किंवा परदेशात राहिलेल्या लोकांची गोष्ट सोडून द्या. पण सर्वसाधारण लोक अजूनही चांगले आहेत. काही स्वतःला आधुनिक व पुढारलेल्या म्हणवून घेणाऱ्या संस्थाही भारतात सुरु झाल्या आहेत. विशेषतः मुंबईत हा प्रकार बोकाळला आहे व पुण्यातही ते लोण पोचले आहे. पुण्यातल्या मुली तर स्वतःला मॉडर्न समजून सिगारेट-पान-मद्य असे प्रकार करण्याइतक्या धीट झाल्या आहेत. हे सर्व जीवनाबद्दलच्या विचित्र कल्पना डोक्यात घुसल्यामुळे होत असावे असे मला वाटते. किंवा कुठल्या सिनेमानटींचे पाहून त्या तसं करायला बघतात. पण त्या नट्यांच्या आयुष्यातही नीतीमूल्ये नाहीत. त्यांना नीतीमूल्यांबरोबर तडजोड पत्करावी लागते आणि इतके करूनही आयुष्यात त्या काय मिळवतात? म्हणून आपण साधारण व सशील कुटुंब बनून राहणे हेच योग्य. पण पाश्चिमात्य लोकांना तेथील विशिष्ट जीवनपद्धतीमुळे ही गोष्ट मानायला अवघड आहे. पण एकदा ते सहजयोगात आले की हे सर्व आपोआप सुटून ते इतके सुंदर सहजयोगी बनतात की मलाच आश्चर्य वाटते. त्यांच्याकडे प्रत्येकाला आपल्या मनाप्रमाणे काहीही करण्या ! स्वातंत्र्य असते. भारतामध्ये मुलांना तशी मुभा नसते. वाटेल तिथे वाटेल तेव्हा जाण्याची परवानगी नसते. त्या स्वातंत्र्यामुळेच तिकडचे अनेक लोक वाया गेले पण जे वाचले ते मोठे झाले, या स्वतंत्रतेमधूनच भारतीय संगीतही हे सहजयोगी तीन-चार महिन्यात शिकले; भारतीय लोकांना ते जमत नाही कारण त्यांच्यावर बरीच नियंत्रणे असतात. बंधने असतात आणि धर्माच्या बंधनाखाली त्यांना रहावे लागते.

मुख्य म्हणजे तुम्हाला जे स्वातंत्र्य सहजयोगात मिळाले आहे त्यामधून तुम्हाला वेगळे असे विशेष व्यक्तिमत्त्व मिळाले आहे. ते स्वातंत्र्य कसे ठेवायचे हा तुमचा व्यक्तीगत प्रश्न आहे. पण मुलांच्या बाबतीत त्यांना अवाजवी शिस्तीत व बंधनात ठेवणे मला वाटते चांगले नाही. रविशंकर सतार शिकत असताना एक स्वर चुकीचा लावला म्हणून त्यांच्या गुरूंनी तंबोराच त्यांच्या डोक्यावर मारून फोडला. तसेच शिष्यांना उलटे टांगून ठेवणे वगैरे प्रकारही मूर्खपणा आहे. त्यामुळे शिष्यांच्या अवघड गोष्टी आत्मसात करण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. तसे काही नसल्यामुळे या पाश्चात्य मंडळींना भारतीय संगीत तीन-चार

महिन्यात शिकता आले. मग भारतीय लोकांना ते का जमू नये? त्या लोकांची आकलनशक्तीच तीव्र आहे. म्हणून सहजयोग्यांना पूर्ण स्वातंत्र्य दिले पाहिजे. तेच स्वातंत्र्य मुलांनाही मिळाले पाहिजे. त्यामुळे ती बिघडतील व चुका करतील अशी धास्ती बाळगायची जरूर नाही उलट त्यांची आकलनशक्ती खूप बळकट होईल. म्हणूनच पाश्चात्य लोक स्वातंत्र्य वापरून सत्याकडे आले की ते तेजस्वी बनतात.

म्हणून माझी भारतीय लोकांना विनंती आहे की मुलांवर कसलेही अती दडपण आणू नका. आपण मुलांबरोबर खूप आनंद मिळवतो पण अवाजवी बंधनेही त्यांच्यावर लावतो. इथे का बसलास, हे का घेतलेस इ. सारखे टोचू नका. त्यामुळे मुलांनाही तेच अंगवळणी पडते. अशा अवाजवी काटेकोरपणामुळेच मुलांचे व्यक्तीमत्त्व खुंटते हे माझ्या लक्षात आले. पाश्चात्य लोक खराबच आहेत असे सारखे म्हणण्यात अर्थ नाही आणि एकदा ते सहजयोगाकडे वळले की ते मास्टर बनतात. स्वातंत्र्य द्यायचे का नाही हाच मुळात प्रश्न आहे. आत्मसाक्षात्कारानंतर आपल्यामध्ये विवेक जागृत झालेला असतो. आणि मुले तर जन्मतःच आत्मसाक्षात्कारी असतात. त्यांना हळुहळू सर्व सहजयोग समजेल आणि तो आत्मसात करून त्याचा आविष्कार ते प्रकट करू शकतील.

आज मी हे आत्म्याच्या स्वतंत्रतेबद्दल सर्व तुम्हाला सांगितले. म्हणून आपण मुलांना आणि त्यांच्यामधील अध्यात्मिकतेला समजून घेतले पाहिजे. त्यांच्यामधील धर्मपण जागृत झालेला आहे. आपण त्यांच्या सारखे मागे लागत जाऊन त्यांच्यावर बंधने घालू नये; उलट त्यांना काय करायचे ते करू दे. ते कुठल्याही गोष्टीबद्दल मर्यादेबाहेर जाणार नाहीत. तसेच त्यांच्या भविष्याची आत्तापासूनच काळजी करू नका. मी तर काही सात-आठ वर्षांची मुलेही बुद्धीमान असल्याचे बघितले आहे. मी एकदा टी.व्हीवर लहान-लहान मुलांचा कार्यक्रम बघत होते. त्यात एकीने तीन वर्षाची असूनही अगदी हिराबाई बडोदेकरसारखे गाणे म्हणून दाखवले. ती आत्मसाक्षात्कारी नसतीलही पण त्यांची बुद्धीच तीक्ष्ण आहे. कदाचित् पूर्वजन्मापासूनची ती क्षमता असेल. म्हणून आपण मुलांबाबत अती काटेकोरपणा व शिस्त बाळगू नये. हा आपल्या सहज-संस्कृतीचाच भाग आहे. भारतीय संस्कृतीमध्ये असे बसत नाही असे कदाचित तुम्हाला वाटेल पण मुलांबद्दलची आपली धारणा सहज-संस्कृतीमध्ये बसेल हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणजे त्यांना जन्मतःच साक्षात्कार मिळाला आहे याची किंमत आपल्याला समजेल. मी तर मुलांमध्ये फार रमते; त्यांचे बोलणे किती मधुर असते, एखाद्या व्यक्तीबद्दल किंवा गोष्टीबद्दल ती किती गोड बोलतात. त्यांना बोलण्याची प्रेरणा व मुभा दिली की ती अगदी मजेदारपणे सांगतात.

तुम्ही पाश्चात्य मंडळींनी व बऱ्याच उत्तर-भारतीय लोकांनी सहजयोग चांगला मुरवला आहे. आणि त्यांनी भारतीय संगीत व कलेमध्ये मिळवलेले प्राविण्य मलाच आश्चर्यकारक वाटते. म्हणजे तुम्ही चांगले स्वातंत्र्य मिळवले आहे. आता त्याचा आविष्कार करण्याकडे लक्ष द्या व तुम्हाला जे सहजयोगातून मिळाले आहे ते प्रकट होऊ द्या. तसे केले नाही तर त्याचा फायदा तुम्हाला मिळणार नाही. संख्येने तुम्ही आपापल्या देशात नगण्य असाल पण तुमची पातळी फार वरच्या दर्जाची आहे. म्हणून तुम्ही तन-मन-धनाने सहजयोगाच्या कार्याला व प्रसाराला वाहून घेतले पाहिजे.

मी आता या (पाश्चात्य) लोकांना मुलांबद्दल सांगत होते. त्यांच्याकडे कायदा असा आहे की कुणालाही कुणाच्याही विरुद्ध दावा करता येतो. उदा. शाळेतील शिक्षकाने एखाद्या मुलाला रागावले तर त्या शिक्षकावर केस करून त्याचा जीव हैराण केला जातो. मुले पण वाह्यात असतात, कसेही वागतात, काहीही करतात; त्यांच्यावर कुणाचे बंधन नाही. एकदा मी इंग्लंडमध्ये असताना ट्रेनने चालले होते तेव्हा एकदम पंचवीस-तीस मुले आमच्या डब्यात आली. त्यांनी हातात सुऱ्या घेतल्याचे पाहून मला जरा प्रश्नच पडला व मी त्यांना काही विचारणार एवढ्यात त्यांनी मला गप्प बसायला सांगितले आणि वर म्हणाले की आम्ही इथल्या उशा फाडून त्यात काय आहे ते बघणार आहोत. मग ते सर्व उशा चक्क फाडायला लागले. पुढच्या स्टेशनवर मी स्टेशन-मास्तरला बोलावले तर तो आला आणि त्या पोरांना– ती जेमतेम सात-आठ वर्षाची असतील आणि चांगल्या शाळेत जाणारी होती– रागावुन मारू लागला. मी त्याला सांगितले की झाले ते झाले. आता त्यांना मारू नका, कारण ती पोरे रडायला लागली होती. मग त्याने मला भारतातील मुलांबद्दलग विचारले तर मी सांगितले की येथील चांगल्या शाळेत शिकणारी मुले अगदी शांत व शिस्तीत असतात, मोठ्या माणसांसमोर बोलायचे नाही, दुसऱ्या घरी गेल्यावर त्यांच्याकडे काही मागायचे नाही, कुणी दिले तरी घेऊ का नको म्हणून आई-वडिलांकडे बघतील आणि त्यांनी घे म्हटल्यावरच घ्यायचे अशा शिस्तीत असतात. मुलांशी बोलायला, गप्पा मारायला कुणालाही आवडते. पण मला वाटते की आपण मुलांची जरा जास्तच काळजी घेतो; हे कर, ते कर, हे केलेस का असे सारखे त्यांच्या मागे लागतो. या मुलांचे पाहिले तर त्यांच्या शाळाही जंगलात नाही तर डोंगरावर, कुठेतरी पडतील, धडपडतील याचीही भीती, पण ती मुले मनात आणले तर चित्र काय काढतील, घरं बनवतील, पेन्टिंग करतील!

आपल्याकडे असे बघायला मिळणार नाही. मला वाटते की आपल्या मुलांमधील कर्तुत्व आपण मारून टाकत असतो. तसे व्हायला नको. त्याचबरोबर धार्मिकता आली पाहिजे. पावित्र्य आले पाहिजे. इतकेच नव्हे तर मोठ्यांबद्दल आदरभावपण बाणवला पाहिजे. शिवाय हे लोक आपल्याकडे संगीत शिकायला आले तर फक्त चार महिन्यात मालकोंस रागसुद्धा वाजवायला शिकले, जो राग आपल्याकडे दहा-दहा वर्षे घासून शिकावा लागतो, शिवाय गुरूकडून चूक झाली तर मार खावा लागतो, मग कुठे दहा-बारा वर्षांची खडतर साधना करून संगीतकार बनतात. आपल्याकडचे रविशंकरसुद्धा असेच कष्ट करून शिकले. मग या लोकांना तीनचार महिन्यात कसे जमते? त्यांना तर मुळात आपल्या संगीताबद्दल, संस्कृतीबद्दल काहीच माहिती नाही. म्हणून मला वाटते की आपण आपल्या मुलांचे कलागुण दाबून ठेवल्यामुळेच असे होते. मुलांना सारखे-सारखे रागावू नये. मी तर मुलांना कधीच रागवत नाही उलट काही झाल्यानंतर ती अशी का वागली? याचा विचार करते. तसेच उठल्या-सुटल्या मुलांना दुषणे देणे योग्य नाही. म्हणून मग आपली मुले वाचन करतील, अभ्यास करतील पण त्यांच्यातील कलात्मकता विकसित होत नाही. इथे कलेबद्दलचा आदरभाव कमीच आहे पण दुसरे विशेष म्हणजे सात्विकताही कमी दिसते. मुले स्वतंत्र बुद्धीतून चांगली झाली पाहिजेत, जबरदस्तीचा राम-राम उपयोगाचा नाही. सहजयोगी म्हणून तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे की तुमची मुले जन्मतःच आत्मसाक्षात्कारी आहेत तेव्हा त्यांचा मान ठेवलाच पाहिजे; ते साधु-संतच म्हणून तुमच्या घरी आले आहेत हे लक्षात घ्या. त्यांचे बोलणे ऐकलेत की तुम्हाला आश्चर्यच वाटेल; त्यांना कमालीचे डोके व कमालीची समज असते. इतकी की आपल्यालाही ते जमणार नाही. एकदा माझ्या नातीने माझी साडी मोलकरणीने जमिनीवर टाकली हे पाहिले आणि ती तिला चावली आणि म्हणाली की ही कुणाची साडी आहे हे माहीत आहे का तुला? असे त्यांचे जे वागणे आहे, जे ब्रीद आहे त्याचे कौतुक केले पाहिजे. मुले काय सांगतात हे नीट बघावे व लक्षात घ्यावे, त्यात कसला कमीपणा मानण्याची गरज नाही. आपल्याकडे मुलांवर जी शिस्त लावली जाते ती कमी करावी. त्यातून तुमची ही मुले पार झालेली आहेत, आता तर पुष्कळ लोक पार होणार आहेत. म्हणून त्यांचे वागणे बघावे, त्यांचे विचार बघावे, त्यांच्याशी गप्पा माराव्या; या मुलांशी नुसते बोलतानाही वेगळाच आनंद होतो इतक्या मजेदार गोष्टी ते बोलतात. माझ्या डोक्यात आले की ही परदेशातली मुले शाळेत जातात तिथे मास्तरांना छडी ठेवण्याची परवानगी नसते. तिथे तुम्ही काही म्हटले तरी कायद्यानुसार केस करून शिक्षा देण्याइतपत गोष्टी चालतात. त्यांच्याकडे स्वातंत्र्याच्या विचारांतून अशा कल्पना आल्या आहेत. म्हणून जो जन्मतःच सिद्ध आहेत अशा मुलांचा मान नको का ठेवायला? तुम्ही सहजयोगी नंतर झालात पण ही मुले जन्मतःच सहजयोगी आहेत म्हणून त्यांचा मान ठेवलाच पाहिजे. तसा मान ठेवताना त्यांची थट्टा-मस्करी पण करायची नाही. म्हणजे ते आजच्या सहजयोग्यांच्या बरोबरीत उभे राहतील याची मला खात्री आहे. तसेच त्यांना सहजयोगाचे पूर्ण शिक्षणही दिले पाहिजे. हे जर आपल्यामध्ये घडून आले तर आपली मुले कशातही कमी पडणार नाहीत आणि त्यातुनच आपल्या देशाची सर्व प्रकारे उन्नती होईल.


आपण ज्याला अध्यात्म म्हणतो ते आपल्या देशात भरपूर आहे. अध्यात्म म्हणजे पुष्कळ लोकांना वाटते की हरी-हरी करत बसणे, काही काम न करणे इ. पण तसे काही नसते. -शक्तीच्या संचार झाल्यावर तुमच्यावर परिणाम होणारच. त्यात शंका नाही पण तुमच्या मुलांची मला काळजी वाटते; मी या देशाचे जे भविष्य पाहात आहे त्याप्रमाणे ते फार भारी कर्तबगार लोक तुमच्या पोटी जन्माला आले आहेत. तुम्ही पार झालेले आहात म्हणूनच त्यांनी तुमच्या पोटी जन्म घेतला आहे. हे जर तुम्ही समजून घेतले नाही तर ही साधु-संतांसारखी मुले वाया जातील. म्हणून मुलांना मारणे, त्यांना शिक्षा करणे, त्यांच्यावर ओरडणे-रागावणे हे प्रकार सहजयोग्यांनी अगदी बंद केले पाहिजेत. आजपर्यंत मी असे बोलले नाही पण मी आज विचार केला की लोकांना आता हे समजावून सांगायलाच हवे. तुमच्या मुलांमध्ये ज्या शक्त्या आहेत त्या आणखी जागृत केल्या पाहिजेत.

मुलांना रागावलेले मला मुळीच पसंत नाही. त्यांचे काही चुकले तर त्यांना समजावून सांगितले पाहिजे. त्यांच्यावर जबरदस्ती करू नये. साधु-संत म्हणून ते तुमच्या पोटी आलेले असल्यामुळे त्यांना सांभाळून घेतले पाहिजे, त्यांच्याशी प्रेमाने वागा. ते जन्मतः साक्षात्कारी असल्यामुळे ते चुकीच्या गोष्टी करणारच नाही. तुमचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. कारण हीच मुले मोठी होऊन या देशाचे नागरिक बनणार आहेत. हीच मुले पुढे मोठे कार्य करणार आहेत. आपल्या देशात जे महान थोर लोक होऊन गेले त्यांच्यासंबंधी लोकांना एकंदरीत कमीच माहिती असते त्यांनी खूप त्याग करून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. त्यांच्याबद्दलची माहिती मुलांना समजावून सांगा. नाही तर मुलांना सिनेमा नट-नटी इ. माहिती चटकन होते पण या थोर पुरुषांची त्यांना माहिती व्हायला हवी. या गोष्टी तुम्हालाच करायच्या आहेत.

**तुम्हा सर्वांना अनंत आशीर्वाद**

●●●




SAHAJ MAHILA UDHYO
PUNE